RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
अँड . सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. 13 एप्रिल 2026**

1929- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मोठी बहीण तुळसाबाईचा स्मृतीदिन.
1933- डॉ. सोलंकी यांना मुंबई येथे डॉ. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली मानपत्र.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

सोमवार, १३ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : १०४ | दैनिक | किंमत : ₹५/-
Monday, 13 April 2026 | Year : 6 | Issue : 104 | Daily | Rate: Rs. 5/-




## बौद्ध समाजाने भूमिका स्पष्ट करणे काळाची गरज : वक्त्यांचा सूर

### नागपूरात जातिनिहाय जनगणना 2026-27 विषयावर चर्चासत्र

**नागपूर :** जातिनिहाय जनगणना 2026-27 च्या पार्श्वभूमीवर 'जातिनिहाय जनगणनेत धर्माच्या नोंदीची संविधानिक मिमांसा' या विषयावर महाराष्ट्र ऑफिसर्स फोरम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंजिनियर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनातील कॉन्फरन्स हॉल येथे पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बानाई, नागपूरचे अध्यक्ष अरविंद गेडाम होते. यावेळी मंचावर दैनिक बहुजन सौरभ चे मुख्य संपादक अॅड. डॉ. सिद्धार्थ कांबळे, माजी मनपा आयुक्त सुधीर शंभरकर, अॅड. मिलिंद पखाले आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शशिकांत हुमने उपस्थित होते. प्रास्ताविक करताना महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे महासचिव सच्चिदानंद दारूंडे यांनी विषयाची रूपरेषा मांडली. सुधीर शंभरकर यांनी सांगितले की, समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येकाने अचूक माहिती देणे आवश्यक आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात प्रगणक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार असून अनुसूचित जाती-जमाती संदर्भातील माहिती काळजीपूर्वक नोंदवावी लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले. अॅड. डॉ. सिद्धार्थ कांबळे यांनी जनगणना हा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय असून समाजाने सजग राहण्याची गरज असल्याचे नमूद केले. ते पुढे म्हणाले, संविधानातील कलम 15(2), 16 आणि 24 यांचा संदर्भ देत स्पष्ट केले की, राज्याने समानतेची हमी दिली असली तरी वास्तवातील विषमता दूर करण्यासाठी ठोस माहिती (स्त्रड्डह्लड्ड) आवश्यक आहे.याच पार्श्वभूमीवर त्यांनी बौद्ध समाजासाठी 'जात-महार' आणि 'धर्म-बौद्ध' अशी नोंद करण्याची भूमिका मांडली. परंतु, ही भूमिका स्वीकारताना समाजाने अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण, जातीनिहाय नोंद ही केवळ ओळखीची बाब नसून, ती आरक्षण, प्रतिनिधित्व आणि सामाजिक हक्कांशी थेट जोडलेली आहे. इंद्रा साहनी वि युनियन ऑफ इंडिया या ऐतिहासिक निर्णयाने मंडल आयोगाच्या शिफारशींना मान्यता देत, जातीनिहाय माहिती ही मागासवर्गीयांना न्याय देण्यासाठी अपरिहार्य आहे हे अधोरेखित केले. त्यामुळेच, चुकीची किंवा अस्पष्ट नोंद केल्यास भविष्यातील हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी शशिकांत हुमणे व अॅड. मिलिंद पखाले यांनीही आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करतांना अरविंद गेडाम यांनी सांगितले की, हे चर्चासत्र प्राथमिक स्वरूपाचे असून या विषयावर पुढील काळात आणखी व्यापक चर्चा करण्यात येणार आहे. दरम्यान, इंजि. अरविंद गेडाम यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत वास्तववादी आहे. 1990 मध्ये संसदेने संविधान अधिनियम म्हणजे कॉन्स्टिट्यूशनल शेड्युल कास्ट अमेंडमेंट ऑर्डर 1990 या अंतर्गत घटनादुरुस्ती करून बौद्ध धर्मीय व्यक्तींना अनुसूचित जाती म्हणून दिली आहे., त्यामुळे पूर्वाश्रमीचे अस्पृश्य नागरिक जे बौद्ध धर्मीय आहेत ते कायद्यानुसार अनुसूचित जातीमध्ये नोंदविले जाण्यास व तशी गणना होण्यास ते पात्र आहेत व त्याचबरोबर बौद्ध,म्हणून धर्माची नोंद करून घेण्यास ते पात्र आहेत 1990 पूर्वी बौद्ध धर्मीय व्यक्ती अनुसूचित जाती म्हणून नोंद व गणना करू शकत नव्हते परंतु आता मात्र आपण धर्माच्या कॉलम मध्ये बौद्ध आणि अनुसूचित जाती असा आपला उल्लेख करू शकतो. महार ही जात अनुसूचित जातीमध्ये अंतर्भूत आहे आणि आपल्या नवीन पिढीला मग ते शिक्षणाचे असून नोकरीचे असो अनुसूचित जाती मध्ये महार अशी नोंद करणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना पुढले शिक्षणाचे आणि नोकरीचे फायदे मिळू शकत नाही म्हणून आपल्याला महार ही जात अनुसूचित जाती अंतर्गत नोंदवणं आवश्यक आहे. संचालन सच्चिदानंद दारूंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेंद्र जीवने यांनी मानले. या चर्चासत्राला डॉ. बी.एस. गेडाम, व्ही.बी. चौधरी, दिगंबर गोंडाने, केशव नंदेश्वर, डॉ. जयराम खोब्रागडे, लक्ष्मण बोरकर, दुर्वास चौधरी, राष्ट्रपाल तेलतुंबडे, डॉ. विद्या मानकर, प्रशांत फुलझेले, सुनील थुलकर आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**आजची खरी गरज ...**

* समाजाला एकसंघ आणि कायदेशीरदृष्ट्या योग्य दिशा देणे.
* जनगणनेतील नोंदीबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संविधानिक हक्क अबाधित राहतील याची खात्री करणे.
* जर समाजाने चुकीचा किंवा अपूर्ण निर्णय घेतला, तर त्याचे परिणाम केवळ वर्तमानापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर पुढील पिढ्यांवरही त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच, जातीनिहाय जनगणना हा विषय केवळ चर्चेपुरता न ठेवता, कायदेशीर अभ्यास, ऐतिहासिक संदर्भ आणि सामाजिक वास्तव यांच्या आधारावर ठोस भूमिका निश्चित करणे हीच काळाची गरज आहे.

## उप वर्गीकरण हरकती पाठविण्यासाठी किमान 1 महिना मुदत वाढ द्यावी : समितीला आवाहन




**नागपूर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षितेखाली सरकारने एक समिती गठित केली आहे. न्या. अनंत बदर यांच्या अहवालावर आधारित ही प्रक्रिया आहे. त्यासाठी जनतेचे मत मागविले आहे. यासाठी 'फक्त 11 ते 15 एप्रिल' या चार-पाच दिवसांची मुदत देण्यात आली आहे. हा कालावधी फारच कमी आहे. 'भीम जयंतीच्या तयारीच्या काळात (महात्मा फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती)' ही वेळ ठेवल्याने बौद्ध समाजासह अनेकांना आपली हरकत नोंदवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. जयंती साजरी करताना समाज इतर गोष्टींकडे लक्ष देऊ शकत नाही, हे लक्षात घेता ही वेळ फारच कमी आहे. महाराष्ट्रात 59 जाती अनुसूचित आहेत. सर्वांपर्यंत ही सूचना गेली पाहिजे. सर्वांना संधी मिळाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले आरक्षण हे सर्व अनुसूचित जातींसाठी समान न्यायाचे प्रतीक आहे. आरक्षण हा संवैधानिक मुद्दा आहे. त्यामध्ये कोणताही बदल करताना सर्वांना समान संधी मिळावी आणि सामाजिक एकता अबाधित राहावी, हे महत्त्वाचे आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य सरकारला विवेकाधिकार आहे, परंतु तो वापरताना समाजातील सर्व घटकांचा विश्वास जिंकणे आवश्यक आहे. सर्वांनी शांततेने, एकजुटीने आणि आदरपूर्वक आपल्या मतांचा आवाज उठवावा. डॉ. बाबासाहेबांच्या आदर्शांप्रमाणे सामाजिक न्याय आणि बंधुभाव वाढवण्याचा प्रयत्न करूया. आरक्षण सर्वांसाठी मजबूत आणि न्याय राहावे, हीच आमची अपेक्षा आहे. म्हणून उपवर्गीकरण समिती आणि सरकारने निवेदन देण्यासाठी किमान एक महिन्याची मुदत द्यावी. असे आवाहन विविध आंबेडकरी संघटना व कार्यकर्त्यांनी केले आहे.

## संविधान नष्ट करण्याचे प्रयत्न ...: राहुल गांधी

### 'रन फॉर आंबेडकर'

> या लोकांना देशातील सर्वांसाठी समानता सुनिश्चित करायची नाही. भाजपचे सदस्य आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर हात जोडून केवळ दिखावा करतात, तर त्यांचे खरे उद्दिष्ट संविधानाला हानी पोहोचवणे आहे.
>
> - राहुल गांधी

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीत 'रन फॉर आंबेडकर' आणि 'रन फॉर द कॉन्स्टिट्यूशन' मॅरेथॉनचा शुभारंभ केला. या कार्यक्रमादरम्यान त्यांनी भाजप आणि आरएसएसवर जोरदार टीका केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वात मोठा संदेश संविधान आहे, असे त्यांनी म्हटले. आरएसएस आणि भाजपची विचारसरणी असलेले लोक आंबेडकरांचे विचार आणि संविधान नष्ट करू इच्छितात, असा आरोप त्यांनी केला. याप्रसंगी काँग्रेसचे खासदार तनुज पुनिया यांनीही भाषण केले. ते म्हणाले की, भाजप सातत्याने संविधानावर हल्ला करत असून त्यांचे नेते खूप आक्रमक आहेत. पुनियांच्या मते, सरकार मागच्या दाराने संविधानाला बगल देत आहे. बाबासाहेबांची विचारधारा आणि संविधान यांचे रक्षण करण्यासाठी आपण सर्व एकजूट



आहोत, हे लोकांना दाखवण्यासाठी ही मॅरेथॉन आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्द्यावर तनुज पुनिया म्हणाले की, काँग्रेस नेहमीच याच्या बाजूने राहिली आहे. मात्र, त्यांनी भाजपच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नवीन जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेशिवाय याची अंमलबजावणी करणे चुकीचे आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसची मागणी आहे की, याची अंमलबजावणी जुन्या 2011 च्या जनगणनेऐवजी नवीन जनगणनेच्या आधारावर केली जावी.




## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

**मुंबई :** मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या 92 वर्षांच्या होत्या. शनिवारी त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल केले होते. त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. तसेच छातीत संसर्ग झाल्याने आणि अधिक थकवा जाणवल्याने त्यांच्यावर आयसीयूत उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने संपूर्ण देशभरात तसेच हिंदी, मराठी चित्रपटसृष्टी, गायन आणि कला क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

## भंते ससाईंनी परवानगी नाकारल्यामुळे दीक्षाभूमीवरील 14 एप्रिलचा जयंतीचा प्रबोधन कार्यक्रम रद्द




**नागपूर :** मागील 12 वर्षापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त नागरी जयंती समितीच्या संयुक्त विद्यमानाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन दीक्षाभूमीवर करण्यात येते. विशेष म्हणजे आंबेडकर जयंतीच्या प्रबोधन कार्यक्रमात बौद्ध, ख्रिस्ती, मुस्लिम,सिख धर्माचे तसेच ओबीसी आणि मराठा सेवा संघाचे लोक देखील सहभागी होत असतात. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भदंत सुरई ससाई हे असतात. यावर्षी देखील 14 एप्रिल, 2026 रोजी सायंकाळी 6 डॉ. आंबेडकर जयंती निमित्त वैचारिक प्रबोधनाचा कार्यक्रम दीक्षाभूमीवर आयोजित करण्यात आला होता. परंतु यावर्षी हा कार्यक्रम घेण्यास स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत सुरई ससाई यांनी परवानगी नाकारल्यामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त नागरी जयंती समितीचे डॉ. सूचित बागडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. 14 एप्रिलला 'राष्ट्रनिर्मितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' या विषयावर प्रबोधन कार्यक्रम होणार होता. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून निरंजन टकले (नाशिक), वरिष्ठ पत्रकार, वक्ता आणि सुप्रसिद्ध विचारवंत, हे 'डॉ. आंबेडकरांचे विचार आणि वर्तमान भारतातील त्यांची प्रासंगिकता' या विषयावर मार्गदर्शन करणार होते. तर संवैधानिक विशेषज्ञ डॉ. अनंत राऊत (नांदेड)हे 'लोकशाही आणि वर्तमान काळातील आव्हाने' या भाषण देणार होते. यावेळी विचारपीठावर डॉ. साजिया खान, नागपूर व आर.डी. आत्राम, माजी सहआयुक्त समाज कल्याण व अध्यक्ष गोंडवाना ट्रायबल फौंडेशन, नागपुर हे उपस्थित राहणार होते. परंतु परवानगी नाकारल्यामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. तरी नागपूर शहरातील सर्व लोकांनी आणि बौद्ध विहारांच्या प्रमुखांनी याची नोंद घ्यावी. असिई विनंती समितीच्या वतीने करण्यात आली. भंतेजींनी मध्यम मार्गही नाकारला डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. अशोक उरकुडे, डॉ. बी.एस. गेडाम, डॉ. सूचित बागडे, राजेश लोखंडे हे सर्व मान्यवर भंते सुरई ससाई यांना भेटण्यासाठी इंदोरा बुद्ध विहारात गेले होते. या सर्व मान्यवरांनी कार्यक्रम रद्द करू नका, अशी भंतेजींना हात जोडून विनंती केली परंतु भंते यांनी सांगितले कि, 'मी कार्यक्रम ठरविला आहे. आपला कार्यक्रम होणार नाही.' तेव्हा भंतेजींना सांगितले कि, 'आपला कार्यक्रम देखील त्या ठिकाणी घ्यावा किंवा आपण कार्यक्रमाच्या वेळेत बदल करू.' तरी देखील भंतेजींनी ते मान्य केले नाही. काही व्यक्ती त्यांना चुकीची माहिती देत असल्यामुळे त्यांनी कार्यक्रमाला परवानगी नाकारली असावी. धर्मगुरूची वाद नको म्हणून आम्ही नमते घेतले आहे, असे डॉ. बागडे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत डॉ. एस.बी. गेडाम, डॉ. अशोक उरकुडे, डॉ. प्रदीप आगलावे, राजेश लोखंडे, डॉ. राजकुमार कोसे, प्रा. घनश्याम धाबर्डे, श्रीराम बन्सोड, सुरेश तामगाडगे हे उपस्थित होते.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा !



डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप. बँक लि. नागपूर
मुख्य कार्यालय: एम.ए. १, लक्ष्मीनगर चौक नागपूर.-४४००२२ फोन : ०७१२-२२२३६१७
ईमेल: ambedkarbank84@gmail.com

लक्ष्मी नगर शाखा: एम.ए १, लक्ष्मीनगर चौक, नागपूर-४४००२२. फोन: २२२३६१७
इंदोरा शाखा: मेश्राम भवन, डॉ. आंबेडकर मार्ग बुध्दनगर, नागपूर-४४००१७ फोन: २६४५२९१
त्रिमुर्तीनगर शाखा: १५, गोवर्धन बिल्डिंग त्रिमुर्तीनगर चौक, नागपूर-२२ फोन: २२३१६१७

आपली बँक ! आपल्या सर्वांची बँक !!
समाज घटकांच्या आर्थिक उन्नतिचा दुवा !!!

मान्यवर भांडवलदार, खातेधारक, गुंतवणूकदार, ऋणको, संस्था, हितचिंतक आपणा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन !
अधिकाधिक उत्तम सेवा प्रदान करतांनाच बँकेचे ब्रिद "सामाजिक घटकांच्या आर्थिक उन्नतीचा दुवा" यास बांधील राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या प्रेरणादायी पर्वावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप. बँक लि., नागपूर तर्फे "विशेष कर्ज योजना" सिमित कालावधी करिता सुरू करण्यात आली आहे.

बँकेची आर्थिक स्थिती ३१ मार्च २०२६ अखेर

| विवरण | रूपये लाखात |
|---|---|
| भाग भांडवल | ४०१.२३ |
| ठेवी | ६३३२.४१ |
| कर्ज | ३२२३.१३ |
| निव्वळ मूल्य | ५४८.५८ |
| चालु वर्षाचा नफा (२०२५-२६) | ११.०९ |




सोनेतारण कर्ज
०.८३% मासिक व्याजदरावर



गृहतारण कर्ज
०.९० % मासिक व्याजदरावर

आयु. अरविंद गजभिये
उपाध्यक्ष

आयु. अनिल नगरारे
अध्यक्ष

भिमोत्सव 2026
ऐतिहासिक संकल्प



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त एक भव्य आणि अभिमानास्पद उपक्रम!
135 एकर जमीन खरेदी करून जयंती साजरी करण्याचा अनोखा संकल्प!
किंमत : प्रति एकर फक्त ₹10 लाख + डेव्हलपमेंट खर्च ₹5 लाख
ऑफर फक्त 14 एप्रिलपर्यंत
ताडील, ता. दापोली, जि. रत्नागिरी
HIGHPROFILE BUDDHIST PROPERTIES (where prestige lives)
संपर्क: डॉ. बापूसाहेब सोनवणे
9423071277 /9423572505

“ मनात चांगले विचार ठेवले की जीवन आपोआप सुंदर वाटते... ”



# संपादकीय

## उपवर्गीकरणाचा डाव हा बौद्धांना वेगळे पाडण्याचे षडयंत्र

बौद्धांनी खूप प्रगती केली ते इतराना पुढे जाऊ देत नाहीत असे सांगून मातंग समाजाच्या संघटनेने व त्यांच्या प्रतिनिधिनी अनुसूचित जाती मध्ये वर्गीकरण करण्याची मागणी केली किंवा हे मनुवादी विचार करणाऱ्यांनी त्यांच्याकडून करून घेतले. महाराष्ट्रात 59 अनुसूचित जाती आहेत पण एका जातीचे मत मिळावे आणि फूट पडून मनुवाद जोपासावा या हेतूने उपवर्गीकरण करणे त्या साठी सर्वोच्य न्यायालयाचा अनुकूल आदेश मिळविणे सर्व काही केले गेले. अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यात निर्माण झालेली परिस्थिती आता केवळ धोरणात्मक वाद न राहता सामाजिक असंतोषाचे केंद्र बनली आहे. सरकारच्या भूमिकेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित होत असताना, समाजात उमटणाऱ्या प्रतिक्रिया अधिक आक्रमक आणि तीव्र होत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ‘मुख्यमंत्र्याचा ब्राम्हणी कावा’ हा शब्दप्रयोग संतप्त जनमानसातून पुढे येत आहे, आणि तो सध्याच्या निर्णय प्रक्रियेबद्दल असलेल्या अविश्वासाचे प्रतीक ठरत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाची संकल्पना मांडताना तिचा केंद्रबिंदू सामाजिक न्याय, समता आणि बंधुता हा ठेवला होता. त्यांनी अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे केवळ आर्थिक किंवा प्रशासकीय सुविधा नसून, शतकानुशतके चालत आलेल्या अन्यायाची भरपाई करण्याचे साधन आहे. त्यामागे एक महत्त्वाचा उद्देश होता. समाजातील सर्व घटकांना एकत्रितपणे प्रगतीच्या मार्गावर आणणे. मात्र आज उपवर्गीकरणाच्या नावाखाली त्याच समाजामध्ये विभागणी निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना तीव्र होत आहे. या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वात वादग्रस्त मुद्दा म्हणजे अनंत बदर समितीच्या अहवालावर हरकती नोंदविण्यासाठी दिलेला अवघा पाच दिवसांचा कालावधी. हा कालावधी ज्या पद्धतीने निवडण्यात आला आहे, तो केवळ योगायोग आहे असे मानणे कठीण आहे. महात्मा फुले जयंती आणि भीमजयंतीसारख्या महत्त्वाच्या दिवसांच्या पार्श्वभूमीवर समाजातील बहुसंख्य घटक विविध कार्यक्रमांमध्ये व्यस्त असतात, हे सरकारला ठाऊक नसणे अशक्य आहे. अशा वेळी हरकती मागविणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा केवळ औपचारिक वापर करून प्रत्यक्षात विरोधाची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न असल्याचा संशय निर्माण होतो. याहून गंभीर बाब म्हणजे अहवाल सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध करून न देता हरकती मागविणे. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता ही केवळ अपेक्षा नसून, ती शासनाची जबाबदारी आहे. नागरिकांना संपूर्ण माहिती न देता त्यांच्याकडून मत विचारणे ही प्रक्रिया केवळ अपुरीच नाही, तर ती दिशाभूल करणारीही ठरू शकते. त्यामुळेच या निर्णयामागे हेतुपुरस्सर घाई आणि नियोजन असल्याचा आरोप अधिक तीव्रतेने पुढे येत आहे. याच पार्श्वभूमीवर ‘मुख्यमंत्र्याचा ब्राम्हणी कावा’ हा शब्दप्रयोग समाजात रूढ होताना दिसतो. हा शब्दप्रयोग जरी आक्रमक आणि वादग्रस्त असला, तरी तो पूर्णपणे निराधार नाही असे अनेकांना वाटू लागले आहे. कारण जेव्हा शासनाची भूमिका पारदर्शक नसते, संवाद टाळला जातो आणि संवेदनशील प्रश्नांवर घाईघाईने निर्णय घेतले जातात, तेव्हा समाजात संशय आणि अविश्वास निर्माण होणे स्वाभाविक आहे. हा अविश्वासच अशा तीव्र शब्दांत व्यक्त होतो. आजचा मूलभूत प्रश्न हा आहे की सरकार खरोखरच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने कार्य करत आहे का, की सत्तेच्या राजकारणात काही विशिष्ट घटकांना लाभ मिळवून देण्यासाठी निर्णय घेतले जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ कागदावरची तत्त्वे नाहीत, तर ती शासनाच्या प्रत्येक निर्णयामध्ये प्रतिबिंबित होणे अपेक्षित आहे. मात्र सध्याच्या घडामोडी पाहता या मूल्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना समाजात पसरत आहे. या प्रक्रियेचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे अनुसूचित जातींमध्ये निर्माण होणारी अंतर्गत फूट. उपवर्गीकरणाच्या नावाखाली समाजामध्ये भेदभावाची नवी रेषा आखली गेली, तर त्याचा परिणाम केवळ आरक्षणापुरता मर्यादित राहणार नाही. तो सामाजिक ऐक्य, राजकीय प्रतिनिधित्व आणि सामूहिक प्रगती यांवर दीर्घकालीन परिणाम करेल. त्यामुळेच या विषयावर अत्यंत सावधगिरीने आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून निर्णय घेणे आवश्यक आहे. दरम्यान, समाजातील विविध संघटना, कार्यकर्ते आणि बुद्धिजीवी यांनी या प्रक्रियेविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. ‘करा किंवा मरा’ या भूमिकेतून आंदोलन उभारण्याची भाषा वापरली जात आहे. हा केवळ भावनिक उद्रेक नसून, तो सामाजिक असंतोषाचा आणि अन्यायाविरोधातील प्रतिकाराचा संकेत आहे. जर सरकारने याकडे दुर्लक्ष केले, तर हा विरोध अधिक व्यापक आणि तीव्र होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर मोठे आव्हान उभे आहे. या प्रश्नावर केवळ प्रशासनिक निर्णय घेणे पुरेसे ठरणार नाही, तर समाजाचा विश्वास संपादन करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी अहवाल सार्वजनिक करणे, हरकतींसाठी पुरेसा कालावधी देणे, सर्व घटकांशी सखोल चर्चा करणे आणि निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखणे ही किमान अपेक्षा आहे. ‘ब्राम्हणी कावा’ सारखे आरोप का निर्माण होतात, याचा गंभीरपणे विचार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण अशा प्रकारचे आरोप हे केवळ विरोधकांची राजकीय भाषा नसते, तर ते शासनावरील विश्वास कमी झाल्याचे लक्षण असते. हा विश्वास परत मिळवण्यासाठी सरकारने अधिक संवेदनशील, जबाबदार आणि संवादप्रधान भूमिका घेणे गरजेचे आहे. शेवटी, आरक्षण ही केवळ धोरणात्मक व्यवस्था नसून, ती सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्याचा वापर समाजात फूट पाडण्यासाठी नव्हे, तर एकता आणि समता बळकट करण्यासाठी व्हायला हवा. महाराष्ट्रात अनुसूचित जाती चे धर्मांतरित बौद्ध सुमारे 10 टक्के आहेत. त्यांचे नोकरीतील प्रमाण सुमारे 5 टक्के इतकेव आहे. अद्याप त्यांना पुरेशा प्रमाणात आरक्षण मिळाले नाही. तरी त्यांना दोष देत उपवर्गीकरण करणे या वरून दिसून येते की, बौद्धांना वेगळे पाडण्याचे षडयंत्र आहे. ■ ■

# सामाजिक न्यायाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातीमध्ये वेगवेगळ्या विषयांना स्पर्श केला. विविध विषय अभ्यासले, हाताळले. आपल्या प्रखर बुद्धिमत्तेमुळे त्यांनी वंचित, उपेक्षित समूहाला तर माणसात आणण्याचे काम केलाच; शिवाय या देशातील सर्व लोकांना समान दर्जा, समान संधी, समान न्याय कसा मिळेल या साठी काम केले, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तर आहेतच, त्याचबरोबर ते खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे शिल्पकार व सामाजिक न्यायाचे जनक आहेत.**




हा त्यांचा पैलू मानवी जीवनाच्या परिवर्तनामध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. जे आरक्षण, मूलभूत अधिकार सामाजिक व शैक्षणिक सोयी या पासून वंचित आहेत त्यांच्यासाठी विशेष तरतुदी करून त्यांनी या शोषित, वंचित, पिडित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. आजही सामाजिक न्यायाच्या प्रत्येक चळवळीचा पाया डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर आधारित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जात, धर्म, लिंग, आर्थिक स्थिती व सामाजिक स्तरावरील असमानतेला समता, बंधुता, न्याय या त्रिसूत्रात बांधले. त्यामुळेच आज अनेकांना सामाजिक न्याय मिळतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे या देशातील 140 कोटी जनतेवर अनंत उपकार आहेत. त्यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून या देशातील प्रत्येक नागरिकाला सक्षम बनविण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 2 वर्षे 11 महिने 18 दिवस अत्यंत मेहनत करून जगातील अतिशय चांगली भारतीय राज्यघटना या देशाला दिली. आज भारतीय राज्यघटनेचा अमृत महोत्सव साजरा झाला. या राज्यघटनेच्या माध्यमातून अनेक जण समतेची फळे चाखत आहेत. राज्यघटनेतच त्यांनी समानतेचा पाया रचला. भारतीय राज्यघटना जी आहे त्यात प्रारंभी असलेली प्रास्ताविका बरेच काही सांगून जाते. या प्रास्ताविकेमध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता ही मूल्य तर आहेतच त्याचबरोबर या उद्देशिकेमध्ये अखिल मानव कल्याणाचा, त्यांच्या उत्कर्षाचा कल्याणकारी मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातल्या प्रत्येक घटकाला न्याय कसा मिळेल यासाठी अहोरात्र कष्ट घेतले, परिश्रम केले. यासाठी त्यानी खूप वाचन केले, अनेक संदर्भ ग्रंथ शोधले आणि त्या सखोल ज्ञानातून आणि अनुभवातून भारतीयांना त्यांचे मूलभूत हक्क प्रदान करण्याचे काम त्यानी केले. जे मूलभूत हक्क दिले आहेत, त्यामध्ये समानतेचा स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा, धर्म स्वातंत्र्याचा हक्क आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक हक्क आहे. संविधानिक उपाययोजनाचा हक्क आहे. असे महत्त्वाचे कितीतरी हक्क घटनेच्या माध्यमातून दिले म्हणून ते सामाजिक समतेचे पुरस्कर्ते आहेत. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एका विशिष्ट धर्मापुरते किंवा जातीपुरते मर्यादित काम केले नाही तर सबंध भारतीयांसाठी काम केले. त्यांचा दृष्टिकोन सामाजिक न्यायाचा, सामाजिक सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा होता. 1946 ते 1950 पर्यंत संविधानिक सभेत ते कार्यरत असताना आणि ते राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी राज्यघटना तयार करताना त्यात त्यांनी सर्वांना समान मूलभूत हक्क बहाल केले. समस्त मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगतीसाठी सरकारची जबाबदारी निश्चित करणारी राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे राज्यघटनेमध्ये समाविष्ट केली. यासोबतच अनेक सामाजिक हिताच्या, त्यांच्या उत्कर्षांच्या, त्यांच्या कल्याणाच्या वेगवेगळ्या तरतुदी राज्यघटनेमध्ये केल्या. त्यामुळेच आज या देशातील अनुसूचित जाती- जमाती इतर मागासवर्ग स्त्रिया, लहान मुले, समस्त वंचित घटक जो दुर्लक्षित समूह आहे ते आज सुरक्षित व सन्मानाचे जीवन जगत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लहानपणी व आपल्या जीवनामध्ये अनेकदा हाल, अपेष्टा सहन केल्या. जातीयतेचा सामना केला. स्पृश्य - अस्पृश्य भेदाभेद याचा सामना केला परिणामी, त्यांनी समतेसाठी या संघर्षामुळेच प्रयत्न केले. त्यांनी या देशाची लोकशाही भक्कम करण्यासाठी, राज्यघटनेमध्ये सर्वांच्या उत्कर्षाची, सर्वांच्या उद्धारांची कवचकुंडले दिली. राज्यघटनेच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मूल्य एका विशिष्ट वर्गापुरती नाही तर ती सबंध भारतीयांसाठी त्यांनी दिलेली आहेत, म्हणून ते खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते ठरतात. त्यांना नेहमी वाटायचे की स्त्री-पुरुष, गरीब- श्रीमंत, कनिष्ठ-वरिष्ठ, शिक्षित -अशिक्षित अशा प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, समान संधी, स्वातंत्र्य



डॉ. बबन जोगदंड
9823338266

मिळाले पाहिजे व त्यांच्यासाठी सामाजिक न्यायाची व्यवस्था आणणे ही अपेक्षा लोकशाहीतच पूर्ण होऊ शकते अशी त्यांची धारणा होती. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विरोध करणाऱ्या सर्वंकष राज्यपद्धतीला त्यांचा कायम विरोध होता.अधिकाराचा लाभ समाजातल्या सर्व घटकांना, सर्व जाती-धर्माच्या लोकांना मिळाला पाहिजे. अल्पसंख्याकांना संरक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांचा प्रयत्न होता आणि या सर्व तरतुदी त्यांनी संविधानात केल्या. विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत त्यांनी महान कार्य केले. स्त्रियांना समानतेच्या सूत्रामध्ये बांधण्याचे काम सुद्धा त्यांनी केले. 19 व्या शतकामध्ये देशांमध्ये स्त्रियांची परिस्थिती हलकीची होती. भारतातील स्त्री पूर्णतः रूढी, परंपरा, आचार -विचार चाली-रीती, धर्मबंधने यामध्ये अडकलेली होती, दबलेली होती. तिला सुद्धा बंधनमुक्त करण्याचे काम डॉ. आंबेडकर यांनी केले. महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे प्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ज्ञान आणि विद्या या दोन गोष्टी पुरुषांसाठीच नाही तर त्या स्त्रियांना तेवढ्याच आवश्यक आहेत. पुढील पिढी सुधारण्यासाठी मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका. ज्यावरून जात ओळखली जाते असे राहणीमान बदला. दारुड्या नवऱ्याला, मुलाला, भावाला घरात जेवायला वाढू नका. मुलींना शिक्षण द्या. त्यांचे महाड येथील भाषण इतके क्रांतिकारी होते की, महिलांना त्यांच्या भाषणातून प्रेरणा मिळाली आणि आपण स्वावलंबी स्वाभिमानी बनले पाहिजे असा तिथल्या प्रत्येक महिलांना साक्षात्कार झाला व त्यामुळे अनेक महिला शिक्षणाच्या प्रवाहात आल्या. त्यांच्या स्त्रीविषयक विचारावर लक्ष केंद्रित केल्यास त्यांच्या विचारातून सर्व जातीतील स्त्रियांच्या कुटुंबाची स्थिती व प्रतिष्ठा या बाबतीत डॉ. बाबासाहेबांनी बारकाईने निरीक्षण चिंतन व मनन केल्याचे दिसते. त्यानी भारतीय स्त्रीला गुलामगिरीतून मुक्त केले यातूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा विचार दृष्टीपथास येतो. ते नेहमी म्हणायची की, आज सगळ्यात महत्त्वाची जी गरज आहे ती आपल्या लोकांमध्ये समान राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे. लोकांमध्ये मी प्रथम भारतीय नंतर हिंदू, मुस्लिम, शीख, सिंधी, गुजराती कर्नाटकी अशी भावना निर्माण होण्याऐवजी मी प्रथम भारतीयच आहे, अशी समान राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. त्यानी आपल्या पूर्ण आयुष्यामध्ये भारतीय समाजजीवनाचा विचार केला. त्यांचे जीवन म्हणजे शोषणमुक्त, समतामुलक समाजक्रांतीचा खऱ्या अर्थाने एक रणसंग्राम आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांचे व्यक्तिमत्व हे अन्यायाविरुद्ध पेटून उठणारे होते. कारण त्याना जातीयतेचे चटके वेळोवेळी सहन करावे लागले. त्यांना जातीप्रथेचे निर्मूलन व्हावे, असे अनेकदा वाटायचे. त्यासाठी त्यांनी ‘अनहीलेशन ऑफ कास्ट’ हा ग्रंथ लिहिला. त्यानी जातिव्यवस्थेच्या संदर्भात अनेकदा आपल्या भाषणात जातीव्यवस्था सामाजिक एकोपाला धोका असल्याचे सांगितले. म्हणूनच त्यांनी समतेवर आधारित विवेकील समाज घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या संघर्षामुळेच आज या देशातल्या प्रत्येक नागरिकाला समान शिक्षण, समान हक्क, समान न्याय, समान स्वातंत्र्य, समान बंधुता मिळते आहे. संविधानातील कलम 340 341, 342 अंतर्गत त्यांनी या देशातल्या ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीं व इतर मागासवर्गीयसाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. व त्यांना समानतेच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरितच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समानतेच्या दृष्टीने अत्यंत मौलिक आहे. म्हणून ते खऱ्या अर्थाने समतेचे जनक होत. ■ ■

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 135 वी जयंती साजरी करतांना...

**संपूर्ण जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 135 वी जयंती साजरी होत आहे. बुद्ध-फुले-शाहू- आंबेडकरांचा वैचारिक वारसा म्हणून डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीकडे पाहिले जाते. जयंती सर्वोत्कृष्ट कशी होईल, यासाठी दरवर्षी आंबेडकरी समाजात विचारमंथन होत असते. प्रबोधनासाठी वक्ते आधीच ठरवले जातात. डॉ. बाबासाहेबांची जयंती सर्वप्रथम डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत 1933 साली दादासाहेब गायकवाड यांच्या संकल्पनेतून साजरी झाली होती.**

बहुजन सौरभ

डॉ. बाबासाहेबांच्या जयंती उत्सवासाठी 1946 साली पुण्यात एका प्रतिनिधी मंडळ डॉ. बाबासाहेबांना भेटले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी सभेला संबोधित केले होते, ‘माझ्या पंचावन्नाव्या वाढदिवशी तुम्ही खास अंक काढीत आहात. त्यासाठी तुम्हाला संदेश पाहिजे आहे. व्यक्तिशः माझा वाढदिवस साजरा व्हावा हे मला मुळीच आवडत नाही. मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूतीपूजा कशी आवडेल? पुढारी लायक असेल तर त्याबद्दल कौतुक, प्रेम, आदर या भावना बाळगायला हरकत नाही. पण पुढाऱ्याची देवाप्रमाणे पूजा करणे ही गोष्ट मला बिलकुल मान्य नाही. त्यामुळे त्या पुढाऱ्याबरोबर त्याच्या भक्तांचाही अधःपात होतो. परंतु आपल्या अनुयायांना संदेश दिलाच पाहिजे! अस्पृश्यांना मी काय संदेश देऊ बरे? संदेश देण्याऐवजी मी आपणास ग्रीक पुराणातील एक गोष्ट सांगतो. ‘डिमेटर’ या ग्रीक देवतेवर होमरने लिहीलेल्या स्त्रोतात ही गोष्ट आलेली आहे. ही डिमेटर देवी आपल्या मुलीच्या शोधार्थ केलीओसच्या राज्यात आली. तिने दाईचा वेश धारण केला होता. म्हणून तिला कोणी ओळखले नाही. राणी मेहोनैराने आपले ‘डीमोफून’ नावाचे तान्हे मूल सांभाळण्यासाठी तिची नेमणूक केली. रोज रात्री राजवाड्यातील सर्व मंडळी झोपली म्हणजे दारे बंद करून डिमेटर देवी या मुलाला पाळण्यातून हळूच बाहेर काढी आणि त्याला जळत्या निखाऱ्यावर ठेवी. ऐकणाऱ्याला हे कदाचित क्रूर वाटेल. पण त्या लहान मुलाला ‘महान’ बनविण्याच्या तळमळीने ती हे करीत असे. हळूहळू जळत्या निखाऱ्याची धग सहन करण्याचे सामर्थ्य त्या मुलामध्ये उत्पन्न झाले. त्याच्यामध्ये काहीतरी तेजस्वी, दिव्य अंश विकसित होऊ लागला. पण एके रात्री त्याची आई अचानक खोलीत शिरली. मुलाला शक्तिमान करण्यासाठी चालविलेला तो प्रयोग बघतांच तिने आपल्या मुलाला निखाऱ्यावरून उचलले. अर्थात तिचे मूल तिला मिळाले. पण एका महानतम बनणाऱ्या पुरुषाला मात्र ती मुकली.’ ही गोष्ट काय सांगते? हेच की, विस्तवातून गेल्यावाचून पौरुष्य किंवा देवपण प्राप्त होत नाही! अग्नीदिव्यातून गेल्यावाचून माणसाची शुद्धी होत नाही, त्याचे बळ वाढत नाही. म्हणून पददलीत माणसांना हाल-अपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्निदिव्यांतून गेल्यावाचून मोठेपणा प्राप्त होणार नाही! आपला भविष्यकाळ घडविण्यासाठी त्यांना वर्तमान काळातील सुखांचा आणि गरजांचाही त्याग करायला पाहिजे. या ग्रीक गोष्टीपेक्षा अधिक महान संदेश कोणता आहे? माझ्या मते अस्पृश्यांना तर हा सर्वोत्कृष्ट संदेश आहे. त्यांच्या झगड्यांची आणि हालांची मला जाणीव आहे. आजपर्यंत अस्पृश्यांनी माझ्यापेक्षाही छळ सोसला आहे. असे असूनही मी त्यांना हाच संदेश देतो की, झगडा, आणखी झगडा, त्याग करा, आणखी त्याग करा. त्यागाची आणि हालाची पर्वा न करता एकसारखा संघर्ष चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल! आपले कार्य पवित्र आहे. आपले ध्येय हस्तगत करण्याचा आपण संघटीतपणे निर्धार केला पाहिजे. आपला जन्म ज्या लोकांमध्ये झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य आहे, अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत! गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तन, मन, धन कुर्बान करतात ते धन्य होत. अस्पृश्यांना आपली माणुसकी पुर्णपणे मिळेपर्यंत जे बऱ्यांची, वाईटाची, सुखाची, दुःखाची, संकटांची, मानाची, अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगळतात ते धन्य होत!’ डॉ. बाबासाहेबांचा हा संदेश आजही लक्षात घेण्याजोगा आहे. आमच्या घरासमोर हनुमान मंदिर आहे. दरवर्षी नवरात्रीला येथे गरबा असतो. त्यावेळी डीजे- ढोलताशांचे कर्णकर्कश ध्वनी घराच्या दारे खिडक्यांवर आदळतात तेव्हा हृदयाचे ठोके सुद्धा वाढतात. ध्वनी प्रदूषणाची खरी भयानकता जाणवते. डॉ. बाबासाहेबांच्या जयंती उत्सवात काही ठिकाणी डीजे- ढोलतासे वाजवले जातात. जयंती निमित्ताने तरुणांचा उत्साह असतो त्यांचे वय नाचगाण्याचे असते. ते नाचगाण्यात, केक कापण्यात आनंद मानतात. या हौसेपायी काही मुले गणपती, नवरात्रमध्ये नाचगाण्यात सहभागी होतात. अर्थात डीजे-ढोलताशाची सुरुवात गणपती, रामनवमीच्या शोभायात्रेतून रूजली आहे. परंतु डॉ. बाबासाहेबांची जयंती नाचगाण्यात किंवा कर्णकर्कश आवाजात आहे काय? प्रत्येक संघटना जयंतीसाठी लाखो रुपये वर्गणीतून जमा करतात. देणगीदारांच्या मिळकतीची अशी उधळण होते. अशा कामात आपला अमूल्य वेळ, पैसा आणि मानवी शक्ती खर्ची होते. हा खर्च समाजकार्यात उपयोगी येत नाही. आंबेडकरी समाजासमोर अनेक प्रश्न, संकटे आहेत. समाजाचा मोठा भाग आजही अशिक्षित, दारिद्र्य आणि बेरोजगारीत जगत आहे. त्यासाठी पैसा गोळा करण्याची कल्पना आपण करत नाही. जयंतीमध्ये नाचणारे हे तरुण मात्र आंबेडकरी संघर्षात, मोर्चात फारसे सहभागी होतांना दिसत नाहीत. भीमजयंती हा इव्हेंट बनला आहे. अशा इव्हेंटला डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित जयंती म्हणावे काय? डॉ. बाबासाहेबांनी आपल्या जीवनात असा वेळ खर्ची घातला आहे काय? त्याला आदर्श जयंती म्हणता येईल काय? त्याला पे बॅक टू सोसायटी म्हणता येईल काय? यातून आपल्या समस्या सुटणार आहेत काय? सर्वच आंबेडकरी तरुण डीजेचे समर्थक नसतात. आंबेडकर जयंती अशी अनुकरणीय नसावी अशी अनेकांची भावना असते. पण अशा मताचे किती लोक आहेत? आपल्याला वरील प्रश्नांचे उत्तरे शोधतांना नाचगाने मुक्त जयंतीसाठी पर्याय द्यावे लागतील. डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक गोष्टीसाठी पर्याय दिले आहेत. त्याप्रमाणे आपणसुद्धा समता रॅली, लेझिम, झांकी, मिरवणूक, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भीम गीतगायन - कविता स्पर्धा, प्रश्नमंजूषा, वेशभूषा स्पर्धा, परिषदा, वृक्षारोपण या प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून काही प्रमाणात बदल घडवून आणू शकतो. डॉ. बाबासाहेबांची जयंती ही नाचून नव्हे तर वाचून साजरी करावी लागेल. जयंती उत्सवात सर्वधर्मियांचा सहभाग वाढवून आदर्श जयंतीचा संदेश पोहचला पाहिजे. विहारातून तसे संदेश गेले पाहिजे. कोणताही बदल अचानक घडून येत नाही.





श्रीराम बनसोड,
8208617748

त्यासाठी सतत प्रबोधन, प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसे कृती कार्यक्रम आखावे लागतील. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे आपण वाहक बनलो पाहिजे. नोकरी मिळत नाही म्हणून मुले शिक्षणापासून दूर जात आहेत. जयंतीच्या वर्गणीसाठी आपण अनेकांच्या घरी जातो, तेव्हा त्या घरातील मुले शिक्षण घेतात काय? कोणत्या स्पर्धेची तयारी करत आहेत? शिक्षणात आर्थिक अडचणी आहेत काय? या निमित्ताने चौकशी आरंभिली पाहिजे. सामाजिक अडचणी सोडवण्यावर वर्गणीचा उपयोग झाला पाहिजे. जयंती मोठी केली म्हणजे समाज मोठा होत नाही. समाज प्रबुद्ध बनला तर जयंतीला खरे स्वरूप प्राप्त होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रत्येक विचार, तत्वज्ञान आणि संदेश दिशादर्शक आणि प्रेरणादायी आहेत. त्याचे एक टक्का जरी पालन केले तरी आमचा भविष्यकाळ उज्वल होण्यास वेळ लागणार नाही. रंगराज लांजेवार यांनी म्हटल्याप्रमाणे... ‘प्रेरक भीमाच्या उपदेशांचा वसा अंतरी धरू, साजरी भीम जयंती करू’ वाचकांना 135 व्या भीमजयंतीच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा!!! ■ ■



बहुजन मानस



नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
९९७०८७३५६०

# RSSचे विचार व कार्य पद्धती लक्षात घेता...

1 भाजप : सत्ता मिळविण्यासाठी राजकारण करणे. हे 1950 मध्ये तयार केले गेले आहे. गांधी हत्येनंतर कॉंग्रेस सरकारने आरएसएसवर बंदी घातली होती.

**2. भारतीय मजदूर संघ**

कामगार वर्गामध्ये काम करणे. ही संस्था आज भारतात पहिल्या क्रमांकावर आहे. कॉंग्रेस पक्षाने आणि कम्युनिस्ट पक्षांनी स्थापन केलेल्या इतर सर्व कामगार वर्गाच्या संघटनांना याने मान्यता दिली आहे. कामगारांनी स्वाभाविकपणे कम्युनिस्ट पक्षांसोबत असायला हवे होते कारण ते वोकिंग क्लास क्रांती आणण्याचा दावा करतात.. BMS हे RSS च्या आदेशानुसार कार्य करते आणि RSS च्या हिंदू राष्ट्राच्या बळकटीकरणात मदत करते. त्याचे 10 दशलक्षाहून अधिक सदस्य आहेत.

**3.अखिल भारतीय विद्यार्थी परिषद**

तरुणांमध्ये हिंदुत्ववादी विचारधारा निर्माण करण्यासाठी मुख्यतः महाविद्यालये आणि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना लक्ष्य केले जाते. असा दावा केला जातो की त्याचे 2.8 दशलक्ष सदस्य आहेत. आरएसएसच्या विचारधारेसाठी काम करणारी ही पुन्हा सर्वात मोठी संघटना आहे. देशभरातील शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणविरोधी, मुस्लिमविरोधी आणि डाव्या विरोधी भूमिका घेतल्या जातात.

**4. विश्व हिंदू परिषद**

हे काम हिंदुत्ववादी साधू संतांच्या माध्यमातून केले जाते. ही संस्था इतर सर्व धर्मांच्या विरोधात आणि धर्मांतराच्या विरोधात भूमिका घेते. दंगलीत सक्रिय सहभाग घेते. तीची सदस्यसंख्या 2.8 दशलक्ष आहे.

**5. बजरंग दल :**

याद्वारे बहुतांशी मध्यम जातीचे किंवा मागासवर्गीय लोक संघटित केले जातात. या शिवाय आरएसएस इतर अनेक संघटनांद्वारे आपले विचार लादते.

भारतीय किसान संघाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात, मच्छिमार सहकारी संस्थांच्या माध्यमातून मच्छीमारांमध्ये, अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या माध्यमातून न्यायपालिकेमध्ये, अखिल भारतीय शिक्षक महासंघाच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये, राष्ट्रीय मेडिकोज संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात, विवेकानंद वैद्यकीय मिशनमध्ये, सैनिकी अखिल भारतीय समाजाच्या माध्यमातून गरीबांमध्ये.

राष्ट्र सेविका समिती, दुर्गा वाहिनी आणि शिक्षा भारतीच्या माध्यमातून महिलांचे संघटन करते.

आर्थिक क्षेत्रात स्वदेशी जागरण मंच, विठ्ठल सलाहकार परिषद (आर्थिक सल्लागार संघटना), लघु उद्योग भारती, सहकार भारती (सहकार क्षेत्र). प्रादेशिक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर संस्था आहेत. इतर धर्मीयांना RSS आणि हिंदु राष्ट्र समर्थक बनवण्यासाठी त्यांनी मुस्लिम राष्ट्रीय मंच, राष्ट्रीय शीख संघाची स्थापना केली आहे.

**देशाचे मालक**

आम्ही देशाचे मालक असल्याचा दावा कोणती जात किंवा वर्ग करतो? मनुस्मृतीत ब्राह्मण हे देशाचे मालक आहेत असा दावा केला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी मुखंड गोळवलकर यांनी म्हटले आहे की ते - ब्राह्मण, (आरएसएस) देशाचे मालक आहेत.

श्रीमंत वर्ग वा भांडवलदार अशा मालकीचा दावा करत नाहीत. जगातील कोणत्याही भांडवलदार वर्गाने असा हास्यास्पद दावा केला नव्हता व करत नाहीत. पण भारतातील ब्राह्मण तसे म्हणतात. हा खोटा दावा आहे की त्यात काही तथ्य आहे? जाती रचनेतल्या त्यांच्या स्थानामुळे ते तसा दावा करतात. इतर सर्व जाती ते त्यांच्या खाली समजतात. त्यांना शूद्र म्हणतात. त्याचा अर्थ गुलाम असा आहे. मालक ब्राह्मण, जात. राज्यकर्ते- क्षत्रिय त्यांच्या खाली आहेत. त्यांची सेवा करतात, त्यांचे पालन करतात.




त्यांचा दावा आहे -

- ते जातिव्यवस्थेचे निर्माते आहेत.
- ते धर्माचे निर्माते आहेत.
- ते भाषांचे निर्माते आहेत.
- ते दावा करतात की सर्व भाषांची उत्पत्ती संस्कृत भाषेतून झाली आहे, आणि जी ते म्हणतात त्यांची निर्मिती आहे.
- शतकानुशतके मानसिकता निर्माण करणाऱ्या सर्व यंत्रणा त्यांच्या नियंत्रणात आहेत. वेद, स्मृती, पुराण, रामायण, महाभारत ते आजची आधुनिक माध्यमे, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक इ.

**वैचारिक मालकी**

मीडियातील ब्राह्मण मालकांसारखे वागतात. ते जातिविरोधी किंवा ब्राह्मणवादाच्या विरोधात असलेली मते प्रकाशित करणार नाहीत. मालक जरी ब्राह्मण नसला (बहुतांश वर्तमानपत्रांचे मालक बनिया आहेत ) तरी त्याला ब्राम्हण संपादक ठेवण्याची सक्ती आहे. त्यामुळे विचारप्रक्रियेचा मालक हा ब्राम्हण असतो. अशाप्रकारे सर्व प्रकारच्या माध्यमांवर व मानसिकता निर्माण करणारी यंत्रणा पूर्णपणे त्यांच्या ताब्यात आहे.

मा. स. गोळवलकर म्हणतात, ‘आम्ही मन क्रांती केली आहे. म्हणजे ते लोकांच्या मनाचे स्वामी, मालक आहेत किंवा झाले आहेत.

- या सर्व क्षेत्रात भांडवलदार कुठे आहेत?

म्हणून, भारतातील एक जात ही सर्व जाती-जमाती तसेच इतर धर्मातील लोकांवर वर्चस्व गाजवणारी आहे. ■ ■

# सदाचाराचे जीवन

उद्धारली कोटी कुळे भीम तुझ्या जन्मामुळे... शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी ज्या भारतीय समाजाला लिहिण्याच्या, बोलण्याच्या, स्वाभिमानाने शिक्षण घेण्याच्या, व्यवसाय करण्याच्या पूर्णतः हक्क नव्हता. त्या सर्वांप्रती एक सम्यक दृष्टी ठेवून कुशल चिंतन करून सर्व मानवाचे प्रगतीचे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सम्यक दृष्टीने समस्त मानवाला भारतीय संविधान बहाल केले.आज नवशिक्षित तरुण समाजाला याचा विसर पडलेला आहे. त्यांना वाटते की आपण उच्च शिक्षण स्वतःच्या बुद्धिमत्तेने किंवा स्व प्रयत्नाने घेत आहोत एक अर्थी बरोबर असले, तरीही शिक्षणाचा हक्क, समानतेच्या हक्क, न्यायाच्या हक्क, सर्व प्रकारचे हक्क सामाजिक समतेचा हक्क, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला लिहून दिल्यामुळेच आज आपण ही सर्व प्रगती करू शकतो. म्हणून आज उच्च शिक्षण घेतलेल्या प्रत्येक भारतीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अमूल्य कार्याची परतफेड, उत्तरदायित्व, कृतज्ञता स्वीकारून, उर्वरित समाजकार्य जे आपल्यामागे आपलेच गोरगरीब वंचित ग्रामीण भागात राहिलेले, किंवा झोपडपट्टीमध्ये जंगल पहाडामध्ये राहिलेले, बरेच बंधू भगिनी आहेत. त्यांनाही शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून समतेचे, न्यायाचे, माणुसकीचे, सदाचाराचे जीवन नेमके काय असते याकरिता जाणीवपूर्वक प्रत्येकाने प्रयत्न केल्यास समाजाची आणखी प्रगती उन्नती होण्यास वेळ लागणार नाही. भारतीय समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करावी असे वाटते. ■ ■

मंगलवाटा



सम्राट माटे (मंगलदर्शी)
मो.9075113644

बहुजन सौरभ

# उपवर्गीकरणाविरोधात निर्णायक लढा, भीमजयंतीची हाक

**अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या हालचाली विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, सामाजिक एकतेला बाधा पोहोचविणाऱ्या या प्रयत्नाविरोधात संघटित लढा उभारण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित आरक्षण व्यवस्था उभी केली. शतकानुशतके वंचित राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेला हा अधिकार केवळ सवलत नसून, ऐतिहासिक अन्यायाची भरपाई आहे. मात्र, सध्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा अनुसूचितजातींमध्ये कृत्रिम विभागणी निर्माण करून सामाजिक सलोखा आणि एकजूट कमकुवत करण्याचा डाव असल्याची भावना व्यक्त होत आहे.




**संविधानविरोधी प्रक्रियेचा आरोप**

अनंत बदर समितीच्या स्थापनेपासूनच तिच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. समितीचा अहवाल सार्वजनिक न करता हरकती मागविणे, तसेच अत्यंत कमी कालावधीत - केवळ पाच दिवसांत -प्रतिसाद मागविणे, ही प्रक्रिया लोकशाही आणि संविधानिक मूल्यांना धरून नसल्याची टीका होत आहे.

या पार्श्वभूमीवर समितीची सखोल चौकशी करून ती तात्काळ रद्द करण्याची मागणी पुढे येत आहे.

ॲड. स्मिता कांबळे
मो. 86259 57619

**निर्णायक संघर्षाची भूमिका :**

‘करा किंवा मरा’ या भूमिकेतून आंदोलन उभारण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. संघटित शक्ती आणि तीव्र जनआंदोलनाच्या माध्यमातूनच हा निर्णय रोखता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. हा संघर्ष केवळ आरक्षणासाठी नसून स्वाभिमान, समानता आणि सामाजिक न्यायासाठी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**एकजुटीचे आवाहनः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींमध्ये एकजिनसी सामाजिक एकता टिकून राहावी, यावर भर दिला होता. त्या पार्श्वभूमीवर कोणतीही विभागणी समाजाच्या मूलभूत हिताविरुद्ध असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

सर्व संघटना, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी एकत्र येऊन या प्रक्रियेला विरोध करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**भीमजयंतीच्या पार्श्वभूमीवर ठाम भूमिका :**

येत्या भीमजयंतीच्या निमित्ताने उपवर्गीकरणाला ठाम विरोध, अनंत बदर समिती रद्द करण्याची मागणी आणि संविधानिक हक्कांचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. ■ ■

“ ज्या माणसाजवळ संयम आहे तो प्रत्येक गोष्टीचा धनी असतो... ”



# संविधानाच्या मूल्यांवर आघात?

## उपवर्गीकरण प्रक्रियेवर तीव्र आक्षेप

**जातीचे उपवर्गीकरणाचा विषय पुन्हा खूप चर्चेत आला आहे. सरकारने आणला आहे. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल पब्लिक केला नाही आणि सरकार म्हणते 15 एप्रिल पर्यंत आक्षेप नोंदवा. त्यासाठी सरकारने मुख्यसचिव समिती नेमली. असा कसा कारभार चालला आहे.**

सर्व पूर्व नियोजित आहे असे दिसते. प्रक्रिया खूप गतिमान केली आहे. Atrocity ची राज्यस्तरीय बैठक घ्यायला वेळ नाही. 6 वर्षापासून एकही बैठक नाही. बजेटचा कायदा नाही. अनुसूचित जमाती आयोग कार्यान्वित झाला नाही. Sc-st आयोगासाठी कायदा करायला वेळ नाही. मात्र, उपवर्गीकरणसाठी सगळ्यांनाच वेळ आहे. ठरलेले दिसते सगळे. ही फक्त खानापूर्ती आहे या विषयी 14 मुद्याचे आक्षेप नोंदविणारे पत्र काल दिनांक 11 एप्रिल 2026 ला , माननीय मुख्यमंत्री, मुख्यसचिव, प्रधान सचिव सामाजिक न्याय, आणि barti ला मेल केले. पत्राची प्रत, माहितीसाठी सोबत दिली आहे. माझ्या लक्षात आले त्या मुद्याचा समावेश या पत्रात केला आहे. काही मुद्दे सुटले असतील तर सांगा,. विनंती, प्रत्येकाने सरकारला याविषयी आपले आक्षेप नोंदवावे. एकूणच, ही प्रक्रिया न्यायसंगत नाही. ती त्वरीत थांबवावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती मध्ये याविषयावर चर्चा अपेक्षित आहे.

इ झेड खोब्रागडे भाप्रसे नि,
संविधान फाऊंडेशन नागपूर
12. एप्रिल 2026.

**प्रति**
माननीय नामदार देवेंद्र जी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
माननीय राजेश अग्रवाल IAS, मुख्यसचिव तथा अध्यक्ष अनुसूचित जाती उपवर्गीकरण समिती, मंत्रालय मुंबई.
**विषय :** अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण ची प्रक्रिया थांबविणे बाबत
आदरणीय महोदय

उपरोक्त विषयावर शासनस्तरावर अती वेगाने कार्यवाही सुरू आहे. सेवानिवृत न्यायाधीश अनंत बदर यांची समिती नियुक्त, अहवाल प्राप्त, कॅबिनेट मध्ये चर्चा आणि मुख्यसचिव यांची समिती नियुक्त व एक महिन्यात या समितीचा अहवाल मागणे. ही सर्व अतिशय वेगवान प्रक्रिया आहे. यामागे सरकारचा हेतू स्वच्छ व सामाजिक न्यायाचा दिसत नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने एवढेच म्हटले की उपवर्गीकरण होऊ शकते. राज्य सरकार करू शकते. केलेच पाहिजे असे बंधन घातले नाही. एम्पिरिकल डाटा , ज्या आधारे उपवर्गीकरण करायचे तो योग्य असला पाहिजे असेही निर्देश आहेत. जनगणना 2027 चा डाटा उपलब्ध झाल्यावर याबाबत विचार करावा.

तथापि, उपवर्गीकरणाला विरोध करताना खालीलप्रमाणे आक्षेप आहे. संविधानाच्या अनुच्छेद 14,15, 21 व 46 शी सुसंगत ही कारवाही नाही. आक्षेपाचे मुद्दे

1. उपवर्गीकरण व्यावहारिक नाही. उपवर्गीकरण केले तरी प्रत्येक गटात अती मागास राहणारच आहेत. अती मागासवर्गास लाभ देण्यासाठी उपवर्गीकरण हा उचित मार्ग नाही.
2. उपवर्गीकरणासाठी जनगणनेचा अद्यावत डाटा उपलब्ध असणे आवश्यक आहे. 2011 च्या जनगणनेचा डाटा 15 वर्षापूर्वीचा आहे, वापरता येणार नाही, खरे चित्र समोर येणार नाही. तेव्हा जनगणना 2027 चा डाटा आल्यावर तो विचारात घेण्यात यावा.
3. माननीय न्यायमूर्ती अनंत बदर यांचा अहवाल सार्वजनिक करण्यात आला नाही. त्यामुळे या अहवालात नेमके काय आहे, कशाचा आधार घेतला आहे, काय शिफारशी आहेत हे कळायला मार्ग नाही. अहवाल सार्वजनिक करावा म्हणजे मुख्य सचिव समिती कडे योग्य आक्षेप नोंदविता येतील.
4. सरकारने सगळ्या क्षेत्रात आरक्षण धोरणाची अंमलबजावणी इमानदारीने केली नाही. टक्केवारीनुसार अनुसूचित जातीची आरक्षित पदे, पदोन्नतीसह, प्रथम भरावीत.
5. संविधानाने दिलेले आरक्षण हे राजकीय क्षेत्र, शिक्षण व सार्वजनिक सेवा, केंद्र व राज्य सरकारला लागू आहे. तेव्हा हा डाटा अभ्यासासाठी घ्यावा आणि जातनिहाय प्रतिनिधित्व अभ्यासावे.
6. मुख्यसचिव समिती मध्ये अनुसूचित जातीचे प्रतिनिधी घ्यावेत. केवळ शासकीय अधिकाऱ्यांची समिती नसावी. आताची मुख्यसचिव समिती ही सर्वसमावेशक नाही. आक्षेप, सूचना, निवेदने आलीत तरी मुद्दे विचारत घेतल्या गेले की नाही हे कसे कळणार? सरकारचा या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोन सुरुवातीपासूनच एकांगी व पक्षपाती राहिलेला आहे.
7. उपवर्गीकरण करताना, लोकसंख्या, शिक्षण , आर्थिक व सामाजिक स्थिती, दरडोई उत्पन्न, उपजिविकेची साधने, व्यवसाय, शेती, जोडधंदा, धंदा, व्यापार, उद्योग, पक्की घरे, बेरोजगारी, जातीय अत्याचाराच्या घटना, आरोग्य, इत्यादी विषय आहेत. यावरील अचूक आकडेवारी अभ्यासासाठी घ्यावी.
8. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण सोबतच अनुसूचित जमातीचे उपवर्गीकरण हा सुद्धा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने म्हटला आहे. राज्यसरकार फक्त अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासाठी आग्रही आहे. हा भेदभाव आहे.
9. संविधानाचे प्रारूप सुद्धा 8 महिने जनतेच्या सूचना व हरकती आक्षेप साठी सार्वजनिक केले होते. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल जाहीर केला नाही आणि मुख्यसचिव समिती नेमून एक महिन्याचा अवधी देण्यात आला आहे. हे सरकारचा पूर्वग्रह दर्शविते .
10. अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, सामाजिक आर्थिक विकासासाठी राज्य सरकारने महामंडळे सुरू केली होती, प्रस्तावित उपवर्गीय जातींसाठी ही महामंडळे आहेत. त्यांची उपलब्धि अभ्यासासाठी आणि ती सार्वजनिक करावी. महामंडळाचे कार्य उद्देश पूर्तीसाठी झाले नसेल तर त्यास जबाबदार कोण? राज्यसरकार ने जबाबदारी स्वीकारावी. जातीनिहाय महामंडळे असताना अतिमागास यांना न्याय मिळाला नाही तर उपवर्गीकरणाने न्याय कसा मिळेल?
11. महत्वाचा मुद्दा असा की सर्व क्षेत्रातील प्रतिनिधित्व ठरविण्यासाठी अनुसूचित जातीच्या महार व धर्मांतरित बौद्ध यांची एकत्रित लोकसंख्या विचारात घ्यावी.
12. अनुसूचित जातीच्या महार समाजाने संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन बुद्धाचा विचार स्वीकारला, बौद्ध झाले, उच्चशिक्षण घेतले आणि प्रगती केली. या द्वेषामुळे उपवर्गीकरण प्रक्रिया खूप जलद गतीने होत आहे असे दिसते. एखादा समाज पुढे जात असेल तर कौतुक केले पाहिजे, प्रोत्साहित केले पाहिजे आणि जो मागे राहिला त्यास इतरांच्या बरोबरीत आणण्यासाठी संविधानाचे अनुच्छेद 21 व 46 नुसार सरकारने काम केले पाहिजे. उपवर्गीकरण हा मार्ग नव्हे.
13. शैक्षणिक, सामाजिक आर्थिक क्षेत्रात पुढे गेलेल्या समाजाबरोबर, अनुसूचित जाती जमाती यांना, आणण्यासाठी केंद्र व राज्यसरकारने लोकसंख्येचे आधारावर सहाय्या




पंचवार्षिक योजनेपासून बजेट देणे सुरू केले. अनुसूचित जाती उपयोजना , आदिवासी उपयोजना. यावर सरकारने श्वेत पत्रिका काढून अंमलबजावणी व उपलब्धि चा अहवाल जाहीर करावा. मागील दोन दशकाच्या प्रगतीचा अहवाल जाहीर करावा आणि बजेट चा कायदा करावा. महामंडळे, कॉर्पोरेशन, जिल्हा वार्षिक आराखडा, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती मधील निधी, बजेट चा निधी आणि योजना असताना अनुसूचित जातीतील काही जाती अती मागास कसे राहिल्यात? कोण जबाबदार?
14. उपवर्गीकरणाचे नावे जातीजातीत द्वेष निर्माण करणे, संविधानिक तत्वाचे विरोधी काम आहे. नोकरीतील आरक्षणाची टक्केवारी विभागून अती मागास या शैक्षणिक सामाजिक आर्थिक विकास होणार नाही. तसेही आता, खाजगीकरण झपाट्याने वाढले आहे. शाळा, कॉलेजेस, विद्यापीठे, उद्योग सगळे खाजगीकरणात आहे. येथे आरक्षण लागू करावे. आणि अती मागास यांना संधी द्यावी. समाज एकोप्याचा असला पाहिजे, बंधुभाव असला पाहिजे. परंतु उपवर्गीकरणचे नावाने या संविधानाच्या उदात्त तत्वांना तिलांजली देण्याचे काम सरकार करू नये. वरील मुद्दे विचारात घेता, उपवर्गीकरणाची प्रक्रिया चांगल्या हेतूने सुरू केली नसल्यामुळे , आणि अती मागास जातींना इतरांचे बरोबरीत आणण्यासाठी इतर उपाय उपलब्ध असतांना , आरक्षणाचे विभाजन करण्यासाठी व एकूणच आरक्षण धोरणच संपुष्टात आणण्यासाठी सरकार काम करीत असल्यामुळे आक्षेप आहे. हे आक्षेप विचारात घेऊन, प्रक्रिया थांबवावी आणि न्यायमूर्ती अनंत बदर यांचा अहवाल सार्वजनिक करावा, जनगणना 2027च्या डाटाची प्रतीक्षा करावी अशी शासनास विनंती आहे. ■ ■

: माझे मत :

ई. झेड. खोब्रागडे
9923756900

# दिखावा

## अनंतायन


ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

नाते मग ते कोणतेही असो. जर दुःखात ऊपयोगी पडत नसेल तर सुखात त्या नात्याला कोणताही अर्थ उरत नाही. आपल्या वागण्यात नम्रता असावी लागते कारण ह्या जगात आपण पाहुणे म्हणून आलेले आहोत. आपण अमीर अर्थात श्रीमंत जरूर असू पण अमर मात्र निश्चितच नाही. म्हणून शरीराला एकवेळ चमकवले नाही तरी चालेल पण आपल्या आत्म्याला चमकवण्यावर भर दिला पाहिजे कारण शरीर हे एकदिवस या मातीत मिसळून जाईल पण आत्मा हा स्वर्गात जाणार आहे. शरीर तो लिफाफा आहे जो येथेच फाडून फेकावा लागतो पण आत्मा हे ते पत्र आहे ज्याला ईश्वर वाचणार आहे. हे सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, शरीर हे भाड्याचे घर आहे. त्याला वाजवीपेक्षा जास्त सजवण्याच्या भानगडीत न पडता जेथे कायमचा रहीवास करायचा आहे त्या जागेला सजवा, फुलवा आणि जोपासा. माणसांना जपा. लक्षात ठेवा की, शब्द आणि विचारसरणी कधीकधी दुरावा निर्माण करते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कधी आपण समजून घेत नाही तर कधी समोरच्याला समजून सांगू शकत नाही. माणसाने आहे तसेच दिसावे. दिखावा करायचा प्रयत्न करू नये कारण काळी गाय काळे दुध देत नाही, काळी कोंबडी काळे अंडे देत नाही. काळी जमीनही पांढरा शुभ्र कापुस पिकवतेच ना!. पण याऊलट गोड बोलून वाईट कृत्य करणारी व्यक्ती त्याचा स्वार्थ साधून घेऊ शकते पण दुसऱ्याच्या नजरेत आदराचे स्थान कधीच प्राप्त करू शकत नाही. ज्या व्यक्तीला दुखावले गेले आहे ती व्यक्ती भलेही आपले दुःख दाखवणार नाही मात्र हे नक्की आहे की, ‘पलकों में आँसु और दिल में दर्द सोया है, हँसनेवालों को क्या पता? रोनेवाला किस कदर रोया है ‘जर कुणी त्याला काय घडले हे विचारायचा प्रयत्न केलाच तर तो शेवटी एवढेच ऊत्तर देईल की,
**‘छोड़ो ना यार, क्या रखा है सुनने और सुनाने में, किसीने कसर नहीं छोड़ी दिल दुखाने में.’** ■ ■

# डॉ. बाबासाहेब त्यांची नातू मंडळी... अन आपण लेकरं

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर - ‘तुम्ही कुठल्याही दिशेला वळा, जात हा एक असा राक्षस आहे जो तुम्हाला आडवा येणारच. या राक्षसाला गाडल्याशिवाय राजकिय सुधारणा शक्य नाही; आर्थिक सुधारणा शक्य नाही... ही खेदाची गोष्ट आहे की आजही जातींची पाठराखण (जातींचा बचाव) करणारी लोकं आहेत...**




(Annihilation of Caste - जातींचा समूळ नाश, 1935)
डॉ. बाबासाहेबांची नातू मंडळी (भारतीय बौद्ध महासभा मार्फत): जनगणनेत ‘धर्म - बौद्ध’ तर ‘जात - महार/चांभार/मांग/ढोर’ लिहा... अर्थात -डॉ. बाबासाहेबांमुळे जरी तुम्ही धम्माने बौद्ध झाला असाल तरी आम्हा नातवांमुळे हिंदू धर्माच्या अस्पृश्य जाती उरावर घेऊन मिरवा.. अन पुन्हा त्या गटार गंगेत लोळा..- विषमतावादी हिंदू धर्माला मूठमाती देऊन डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारला.. आपल्यालाही दिला. याऊलट...सावरकर त्याची हिंदू महासभा, RSS व इत्तर कट्टरपंथी हिंदुत्ववादी संघटनांनी बुद्धाला नेहमीच विष्णूचा अवतार मानला व बौद्ध धम्माला हिंदू धर्माचा भाग. तर... डॉ. बाबासाहेबांची नातू मंडळी, भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने, बौद्ध धम्मात हिंदू धर्माच्या जातीपाती घुसडून जणुकाही वरील हिंदुत्ववादी संघटनांची तळी उचलून धरण्यास धडपडताहेत.. साधी सोप्पी बाब आहे.. बौद्ध झालेल्या अस्पृश्यांनी बौद्ध धम्मासोबत आपापली जात लावली... बौद्ध झालेले हिंदू धर्मातील मराठा/कुणबी/शिंपी/लोहार इत्यादी इत्यादींनी धर्म बौद्ध मात्र जात आपापली मराठा/कुणबी/शिंपी/लोहार/सुतार इत्यादी इत्यादी असे जातीपातीना कवटाळले तर मग समतावादी, विज्ञानवादी बौद्ध धम्म अन टोटल वाया गेलेला विषमतावादी हिंदू धर्म यात फरक तो काय राहणार... म्हणजे..एखाद्या मिशनरी प्रमाणे समतावादी बौद्ध धम्माचे संवर्धन करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी ‘भारतीय बौद्ध महासभा’ स्थापन केली तर त्या भारतीय बौद्ध महासभेचा वापर डॉ. बाबासाहेबांची नातू मंडळी बौद्ध धम्माला हिंदू धर्मा सारखा जातीपातीने बरबटलेला एक विषमतावादी धर्म बनवू पाहताहेत... भारतीय बौद्ध महासभेच्या जोरावर डॉ. बाबासाहेबांनी, -‘मी सारा भारत बौद्धमय करीन..’- अशी घोषणा केली होती. तर याचभारतीय बौद्ध महासभेला ओलीस धरत डॉ. बाबासाहेबांच्या नातवांनी आहेत त्या बौद्धांना पुनश्च हिंदू बनविण्याचा घाट घातलाय.. जणू. ‘एक अत्यंत महत्वाची अन तेव्हढीच गंभीर अशी नोंद आपल्याला घ्यावी लागेल-’ जगात बौद्ध धर्माचे/धम्माचे अनेकानेक पंथ आहेत. बौद्ध धम्माचे अनुयायी ज्या ज्या प्रदेशात धम्म घेऊन पोहोचले त्या त्या प्रदेशातील त्यावेळी अस्तित्वात असलेले धर्म/जीवन पद्धती/स्थानिय संस्कृती यांचा धम्माशी संकर झाल्याने मूळ धम्मात अनेक प्रथा घुसल्या अन वेगवेगळे पंथ निर्माण झाले... याच मार्गाने कर्मकांडाला प्रखर विरोध करणाऱ्या धम्मात कर्मकांड शिरला. धम्म स्वीकारतांना डॉ. बाबासाहेबांनी 22 प्रतिज्ञा वदवून घेतल्या त्या याचसाठी की डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित धम्म हा प्रस्थापित धम्माच्या पंथापेक्षा पूर्णतया वेगळा व आधुनिक काळाशी/विज्ञानातील सुसंगत असा. आपण ज्या हिंदू धर्माच्या जात नावाच्या घाणीत खितपत पडलो होतो तिचा त्याग करून आपण बौद्ध धम्मात प्रवेश करतोय/केलाय हे नेहमीच लक्षात रहावे म्हणून त्या 22 प्रतिज्ञांच स्मरण. जगभरात पसरलेल्या बौद्ध धम्माच्या अनेक पंथांपैकी एकात ही अजूनतरी भारतातील हिंदू मध्ये असलेल्या जातीपाती नाहीत.. तुम्ही जर जनगणनेच्या सरकारी दरबारी जनगणनेत आपल्या बौद्ध धर्मात पूर्वाश्रमीची अस्पृश्य जात नोंदवली तर आजतागायत जातीपातींपासून अलिप्त राहिलेला बौद्ध धम्म देखिल जातींनी लुप्त होईल अन डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर उरात बाळगलेले जातीविध्वंस करण्याचे स्वप्न तर मातीमोल होईलच होईल पण अडीच हजार वर्षात घडले नाही ते, बौद्ध धम्मात जाती घुसडण्याचे, पातक भारतातील ‘महार’ या ‘शूर जमातीच्या’ माथ्यावर कलंक बनून विराजमान होईल ते कायमस्वरूपी अन इतिहासात देखील तशीच ठळक नोंद घेतली जाईल.. पण.. हे सर्व कशासाठी करणार आपण? आरक्षणासाठी? आरक्षण हे जात-जनगणनेत तुम्ही काय लिहिलंय हे पाहून मिळत नसते तर तुमच्याकडील जातीचा दाखला पाहून दिले जाते. आणि अत्यंत खात्रीने सांगतो, बौद्ध झालेल्या अनेकांकडे ‘हिंदू महार’ हाच जातीचा दाखला असणार.. हवे तर तपासून पहा.. बौद्धांनी जाती-जनगणनेत जात महार/चांभार/ढोर/मांग नाही लिहिले तर त्या जातींची टक्केवारी घटेल? घटू द्या ना जातींची संख्या घटली तर... बौद्ध धम्म स्वीकारल्याने भारतातील अस्पृश्य जातींची टक्केवारी कमी झाली हे समोर येणे ही शोचनीय नव्हेतर अभिनंदनीय बाब आहे.. याच साठी तर बौद्ध धम्म स्वीकारला गेलाय.. जाती संपविण्यासाठी.. हिंदू धर्म गाडण्यासाठी.. स्वातंत्र्य-समता अन बंधुता आधारित समाज घडविण्यासाठी. जातीय-जनगणनेत जातींची संख्या घटली तर एकूण दलित आरक्षणाची टक्केवारी देखील घटेल? दलित जातवार आरक्षणाची टक्केवारी घटण्याचा घोर लागलेल्यांनी हिंदू - महार/चांभार/ढोर/मांग इत्यादी नोंद करून खुशाल आरक्षणाची टक्केवारी वाचवावी पण स्वतःला बौद्ध म्हणवत हिंदू धर्माच्या जाती चिकटवून घेऊ नये.. दोन्ही दगडांवर पाय ठेवलेल्यांचे हाल काय होतात हे सर्वश्रूत आहेच. सरतेशेवटी - जातीय आरक्षण हे सामाजिक मागासलेपण दूर करण्याचे, खाजगीकरणाच्या मार्गाने सत्ताधाऱ्यांनी पूर्णतया कुचकामी करून टाकलेले, एक माध्यम मात्र ते जातीसंस्था बळकट करण्याचे साधन नव्हे... तसे होऊही नये याची काळजी लेकरांना घ्यावी लागेल..! ■ ■

**मिलिंद भवार**
**मो. 9833830029**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय जल नितीचे जनक

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रख्यात समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ,मानववंश तज्ञ, प्राध्यापक, वकील, लेखक, पत्रकार आणि Statesman होते. मुख्यत्वेकरून ते भारताच्या घटनेचे जनक म्हणून ओळखले जातात.**

**परंतु ते एक उत्कृष्ट जल संसाधन दूरदर्शी व राष्ट्रीय जल नितीचे ते जनक होते हे फार थोड्या लोकांना माहीत आहे. आपण याबाबत विस्तृतपणे जाणून घेऊया.**

**अ) जलनिती धोरणाचा उगम**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर 1942-46 या कालावधीत भारताच्या व्हाईसरॉय मंत्रीपरिषदेचे सदस्य होते व त्यांचेकडे कामगार खात्याचा कार्यभार होता. सिंचन व उद्योग या खात्याचा अतिरिक्त कार्यभार त्यांना देण्यात आला होता.
दुसरे महायुद्ध 1945 च्या दरम्यान संपणार व त्यानंतर भारत स्वतंत्र होणार याची स्पष्ट कल्पना डॉ. बाबासाहेबांना होती. भारताचे मुलभूत विकासा करीता इन्फ्रास्ट्रक्चरचे नियोजन आधीच तयार झाल्यास देशाचा आर्थिक विकास साधता येईल या भूमिकेतून त्यांनी भारतासाठी एका समग्र राष्ट्रीय जलनितीचे धोरण आखले

**ब) राष्ट्रीय जल नितीचे वैशिष्ट्य**
1) डॉ. बाबासाहेबांनी सिंचनाला आर्थिक विकासाचे साधन मानले. प्रादेशिक जलस्त्रोताचा शेतीकरीता सिंचन, औद्योगिक क्षेत्राकरीता जलविद्युत निर्मिती, लोकांकरिता पिण्याचे पाणी, पूरनियंत्रण आणि जलवाहतुक असा बहुउद्देशीय वापर करुन संपूर्ण नदी खोऱ्याचा विकास हा त्यांच्या जलनीतीचा प्रमुख घटक होता.
2) नदीला येणाऱ्या महापुरामुळे लोक पाण्याला संकट समजत. अशा नद्यांवर ठिकठिकाणी धरण बांधुन पाणी अडविल्यास लोकांचे संरक्षण होईल. तसेच त्याचा बहुउद्देशीय वापर केल्यास पाणी एक संकट नसुन ती राष्ट्रीय संपत्ती आहे हा त्यांचा दृष्टिकोन होता.
3) भारतात एकीकडे खुप पाऊस पडतो तर दुसरीकडे पाण्याअभावी दुष्काळ पडतो. अशा स्थितीकरीता नद्या जोड प्रकल्पाचे धोरण त्यांनी सुचविले. आज जी नदीजोड प्रकल्पाची देशात चर्चा होत आहे त्याचा उगम डॉ. बाबासाहेबांच्या नदी जोडप्रकल्पाचे धोरणात आहे..
4) त्यांचे स्पष्ट मत होते की, भारतीय जनता ही जास्त पाण्यामुळे त्रस्त नाही, तर पाण्याच्या कमतरतेमुळे त्रस्त आहे. ते जल व्यवस्थापनमुळे साध्य करता येऊ शकते.
5) शेतीला बारमाही सिंचन मिळाल्यास शेतीचे उत्पादन वाढुन भारत दुष्काळग्रस्त देशापासुन अन्नसंपन्न देश होउ शकतो. बारमाही सिंचन हा दुष्काळाचा विमा आहे हा महत्वाचा सिध्दांत त्यानी मांडला.
6) देशातील प्रमुख नद्या या राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित कराव्यात जेणेकरून भविष्यात त्याचे खाजगीकरण होणार नाही.
7) पाणी हा मूलभूत हक्क आहे. पिण्याचे पाणी व सिंचनाचे फायदे गरीब आणि लहान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले तर त्यामधून सामाजिक व आर्थिक विकास होईल.
नोव्हेंबर 1945 मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत डॉ. बाबासाहेबांनी हेच मौलिक विचार मांडलेत.

**क) वैधानिक संस्थांची निर्मिती**
जलनितीच्या सबंध इंजिनिअरिंगशी असल्यामुळे तांत्रिक दृष्ट्या जलनिती सक्षम करण्याकरीता डॉ. बाबासाहेबांनी दोन महत्त्वाच्या संस्थेची निर्मिती केली. द्व) केंद्रीय जल आयोग देशातील जलस्त्रोतांच्या विकासासाठी त्यांनी सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन (CWINC) ची स्थापना केली होती जी स्वतंत्र भारतात केंद्रीय जल आयोग (CWC) म्हणून ओळखली जाते. आज ही संस्था देशातील सर्व राज्ये यातील नदी व नदीचे खोरे यांचे विकासाकरीता तांत्रिक सल्ला देते. त्यामुळे देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा एकत्रित विकासासाठी वापर होत आहे.
द्व) केंद्रीय विद्युत प्राधिकरण : बहुउद्देशीय प्रकल्पातुन जलविद्युत निर्मितीचे धोरणाचे नियोजन करण्याकरीता त्यांनी केंद्रीय तांत्रिक पावर बोर्ड (CTPB) या संस्थेची निर्मिती केली. ती आज स्वतंत्र भारतात केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) म्हणून ओळखल्या जाते. देशाचे वीज क्षेत्रातील धोरण, निर्मिती, तांत्रिक मानकं ती निश्चित करते. यामुळे देशाचे विकासात या संस्थेची महत्त्वाची भूमिका आहे.

**ड) धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी**
डॉ. बाबासाहेबांनी वरील दूरदृष्टी ठेवून त्यांचे कार्यकाळात दिशादर्शक अशा मुख्य प्रकल्पाचे नियोजन व आखणी

## ऑन इंजिनिअर्स आय




सुध्दा केली होती.
**i) दामोदर व्हॅली प्रकल्प :** पश्चिम बंगालमधील दामोदर नदीला नेहमीच महापुर येत असल्यामुळे प्रचंड हानी होत होती. त्यास Sorrow of Bengal असे संबोधण्यात येत होते. त्यामुळे पूरनियंत्रणारीता या नदीवर व त्यांचे उपनद्यावर पुराचे पाणी अडविण्यासाठी धरणे बांधण्यात आली पूरनियंत्रण, सिंचन, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत असा हा भारतातील पहिलाच बहुउद्देशीय दिशादर्शक प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे बंगालमधील जनतेला त्यांनी दुःखापासुन नुसतेच वाचविले नाही तर बहुउद्देशीय प्रकल्पातुन बंगालचा विकासही साधला.
**ii) भाक्रा-नांगल धरण :** हा सर्वात उंच ग्रव्हीटी धरण आहे. या प्रकल्पातील सिंचन व वीज निर्मितीमुळे आज पंजाब राज्य, धान्य उत्पादनात देशात अग्रेसर आहे.
**iii) हिराकुंड धरण :** महानदीच्या पाण्याचा वापर करुन ओडिशातील सिंचन व पूरनियंत्रण व जलविद्युत असे बहुउद्देशीय प्रकल्पाचे त्यांनी नियोजन व आखणी केली. हे देशातील सर्वात लांब धरण आहे.
**iv) इतर प्रकल्प :** बिहार राज्यातील सोन आणि कोसी नद्यांवर बहुउद्देशीय प्रकल्पांचे नियोजन व आखणी केली.
या प्रकल्पास तत्कालीन पंतप्रधान त्यास Modern Marvels म्हणत.

**इ) संविधानातील तरतुदी-** डॉ. बाबासाहेब एवढ्यावरच थांबले नाहीत तर ज्यावेळी त्यांना देशाचे संविधान निर्मितीकरीता निवडण्यात आले त्यावेळी या क्षेत्रासाठी संविधानात्मक तरतुदी करून त्यांनी केंद्र व राज्य यांची जबाबदारी निश्चित केली द्व) संविधानाचे अनुच्छेद 246 अन्वये केंद्र, राज्य यांची विषय हाताळणी करणारी अनुसुची क्रमांक 7 अ) संघसुची- क्रमांक 56 -आंतरराज्यीय नद्या व नद्यांची खोरी यांचे विनिमयन व विकास ब) राज्य सुची- क्रमांक 17- पाणीपुरवठा, जलसिंचन व कालवे, जलनिस्सारण व बंधारे, पाण्याची साठवण व जलशक्ती (जलविद्युत)या तरतुदींनुसार राष्ट्रीय जलनिती ठरविण्या करीता केंद्र शासनाने राष्ट्रीय जलसंसाधन परिषद (NWRC) ची स्थापना केली. याचे अध्यक्ष प्रधानमंत्री असुन सर्व राज्याचे मुख्य मंत्री हे सदस्य आहेत. द्वद्व) अनुच्छेद 262- आंतरराज्यीय नद्या व नदी खोऱ्यातील पाणीसबंधीच्या तंट्याचा न्याय निर्णयासाठी तरतुद या तरतुदीनुसार आंतरराज्य जलविवाद कायदा 1956 व नदी बोर्ड कायदा 1956 करण्यात आले. संविधानातील तरतुदीमुळे केंद्र व राज्य शासन धोरण ठरविते तर वैधानिक संस्था बहुउद्देशीय धरण प्रकल्पाचे नियोजन, आखणी व तांत्रिक सल्ला देतात. यामुळे देशाचा आर्थिक व सामाजिक विकासात भर पडत आहे. ज्या समाजाला हजारो वर्ष पिण्याचे पाण्यापासून वंचित ठेवण्यात आले त्या समाजाला नव्हेतर, संपुर्ण देशाला डॉ. बाबासाहेबांनी पिण्यासाठी मुबलक पाणी मिळण्याचे कायम नियोजन केले. एव्हढेच नव्हेतर सिंचन, जलविद्युत प्रकल्पामुळे स्वस्त विज, महापुरापासुन जनतेचे संरक्षण या बहुउद्देशीय हित साधण्याकरीता देशासाठी समग्र जलनिती आखली. त्यामुळे ते राष्ट्रीय जल नितीचे जनक म्हणूनही ओळखले जातात. केंद्र शासनाने, डॉ. बाबासाहेबांच्या 125 व्या जयंतीच्या वेळी या अतुलनीय कार्याची दखल घेउन कृतज्ञताही व्यक्त केली होती हे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. निश्चितच ते एक प्रखर देशभक्त होते. डॉ. बाबासाहेबांच्या या असामान्य दुरदृष्टीस व डॉ. बाबासाहेबांच्या 135 व्या जयंतीस विनम्र अभिवादन. ■ ■


इंजि. नरेंद्र ताकसांडे
मो. 9422922668

# जिथे असेल भीमनीती, तीच खरी भीमजयंती

**एप्रिल महिना आला की, गावोगावी, खेडोपाडी एकच आनंद, उत्साह असतो तो म्हणजे भीमजंयती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्याचा. गावोगावी, खेडोपाडी, वार्डावार्डात जयंती उत्सव मंडळाची स्थापना केली जाते, भीमजंयती साजरी करण्यासाठी वर्गणीचे नियोजन केले जाते, लाखो रुपयांचा डिजे लावला जातो.**

वर्षातून एकदाच एकच जयंती येते म्हणून भीमजंयतीच्या नावाखाली बौद्ध लोकांकडून वर्गणी गोळा केली जाते, एखाद्या व्यक्तीने वर्गणी दिली नाही तर त्याच्याबद्दल चुकीचे बोलले जाते. एकच दिवस जयंती आहे म्हणून नाचलेच पाहिजे असा अट्टाहास हा भक्तांचा असतो आणि लक्षात ठेवा भक्त कोणाचाही असो तो देशाला आणि समाजाला घातकच असतो. भीमजंयती निमित्ताने जागृत होणारे आणि वर्षभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विसर पडणारे लोक भीमजंयती साजरी करत असतील तर ती जयंती चुकीच्या मार्गाने केवळ भक्ती म्हणूनच होणार. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी वर्षभर कशाचीही अपेक्षा न ठेवता आपले काम सुरू ठेवत असतो. भीमजंयतीला नाचलेच म्हणजे जयंती साजरी केली असा अर्थ होतो का? एकच दिवस नाचुन डॉ. बाबासाहेब कळणार नाहीत तर वर्षभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचावे लागतात. जो व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचतो तो व्यक्ती नाचण्याचा आग्रह कधीच करत नाही. भीम जयंती साजरी करण्यामागे एक उद्देश असला पाहिजे आणि हो उद्देश साध्य करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य केले पाहिजे. केवळ जयंती आहे म्हणून नाचगाण्यासाठी वर्गणी देतो म्हणजे खुप मोठे काम करतो असे मुळीच नाही. जयंती दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, त्याग आणि आपले अस्तित्व यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. समाजातील होतकरू, गरजू आणि हुशार विद्यार्थी शिक्षण, रोजगार कसा मिळेल? तो मिळवण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी समाजाने काय योगदान द्यायला पाहिजे? यावर चर्चा होऊन उपाय शोधणे आवश्यक आहे.
थोडक्यात आपण दरवर्षी करोडो रुपये जयंती निमित्ताने निरर्थक खर्च करतो. तेच पैसे आपण योग्य प्रकारे, योग्य ठिकाणी खर्च केले असते तर आज समाजात स्वतःच्या शाळा, महाविद्यालये, बँका, दवाखाने निर्माण झाले असते. स्वतःच्या शाळा, कॉलेज असते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण व गुणवत्ता आम्ही देऊ शकलो असतो. आमच्या बँका किंवा इतर उद्योग असते. समाजातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकलो असतो. दवाखाने निर्माण केले असते तर स्वस्तामध्ये एकदम चांगले उपचार सुरू गरजू लोकांना मिळाले असते. या सुविधा निर्माण झाल्या असत्या तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित सुशिक्षित, जागृत विद्यार्थी तयार करू शकलो असतो. एक स्वाभिमानी नागरिक तयार करू शकलो असतो आणि अडीअडचणीच्या काळात योग्य व अल्पदरात उपचार मिळाले असते तर समाजाची प्रगती झाली असे मानले असते. आम्ही फक्त भाषणात बोलतो, ‘बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्यासाठी हे केले, ते केले. परंतु मुख्य प्रश्न हा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर आपण आपल्यासाठी काय केले? डॉ. बाबासाहेब यांचे नाव घेऊन स्वतःचे घरे भरण्यासाठी दुकानदारी सुरू केली. स्वाभिमानाच्या नावाखाली, राजकीय ओळख निर्माण होण्यासाठी आणि स्वतःला थोडाफार तुकडा मिळण्यासाठी प्रस्थापितांचे तळवे चाटायला लागले. अनेक वैचारिक तरुणांकडे बुद्धीमत्ता, समाजासाठी काही करण्याची धमक आहे. परंतु पोटाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना प्रस्थापितांच्या सोबत काम करावे लागते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांचा आवाज दाबल्या जातो. जर प्रस्थापितांच्या नियंत्रणात काम करताना चळवळ व समाजासाठी काही करण्याची धमक असलेल्या तरुणांना स्वतःच्या इच्छा दाबुन ठेवाव्या लागतात. जयंतीनिमित्त लाखों करोडो रुपयांची उधळण करणाऱ्या समाजात चळवळीसाठी व समाजासाठी झटणाऱ्या किती तरुणांना मदत केली जाते? हा गंभीर प्रश्न आहे. चळवळीच्या व समाजाच्या नावाखाली स्वतःचे नेतृत्व निर्माण करून स्वतःचेच पोट भरणारे अनेक झाले म्हणून वामनदादा कर्डक लिहतात..

*‘संघटना हजार झाल्या, नेते हजार झाले।*
*कोना म्हणावे आपुले, चेहरे हजार झाले।*
*तू पाहिलेली स्वप्न पूर्ण झालित का रे।*
*भीमा तुझ्या मतांची माणसे मेलित का रे।।*

आणि आजही वामनदादांचा शब्दंशब्द खरा ठरत आहे. नेत्यांनी चळवळीची व समाजाची वाट लाऊन स्वाभिमान तर दावणीला बांधला आहेच. परंतु, स्वतःला प्रबोधनकार, गायक, लेखक, व्याख्याते समजणाऱ्या लोकांनीसुद्धां चळवळीचे वाटोळे केले. वरील लोक घसा कोरडा होईपर्यंत ओरडून ओरडून वामनदादा कर्डक यांच्याच ओळी सांगतात....




**उद्धरली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे**
अगदी शंभर टक्के बरोबर आहे. भीमाच्या जन्मामुळे कोट्यवधी कुळांचा उद्धार झाला. पण प्रश्न हा आहे भीमामुळे कोट्यवधी कुळाचा उद्धार झाल्यावर, ज्यांचा ज्यांचा उद्धार झाला त्यांनी किती लोकांचा उद्धार केला? एका भीमाने कोटींचा उद्धार आणि कोटींनी मिळून एकाचाही उद्धार केला नसेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत, असे वाटते का? बर हे ही जाऊ द्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जोरजोरात ओरडून सांगणारे व्याख्याते, गायक लाखों रुपये घेतल्याशिवाय येतच नाहीत. बर हे लाखों रुपये घेतात आणि समाजासाठी एकही रुपया देतच नाहीत. ज्या वामनदादांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार खेडोपाडी पोहोचवले त्यांनी रुपयांची कमाई केली नाही आणि दादांचे गाणे गाऊन लाखोंची सुपारी घेणारे आणि समाजातील गरजु घटकावर एकही रुपया खर्च न करणारे खरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत का? की फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला भांडवल बनवून स्वतःचे खिसे भरणारे पाकीटबाज कलाकार आहेत हे बघणे गरजेचे आहे. लाखो रुपये घेऊनही वक्ते आणि गायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चुकीची मांडणी करतात. तिरस्कार, द्वेष निर्माण होईल अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात अनेक गायक रक्तात भीम शोधून विचाराची हत्या करतात. तर अनेक गायक वक्ते स्टेजवर गेल्यावर डॉ. बाबासाहेब यांच्यावर बोलण्याऐवजी इतर कोणत्याही लोकांची नावे घेऊन आमचे वाटोळे केले म्हणतात, कोणत्याही संघटनेचे नाव घेऊन ही संघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य व संविधान विरोधी आहेत म्हणून सांगतात. लाखों रुपये घेऊनही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या जिवनाचे सोने केले, देशाचा उद्धार केला हे सांगण्याचे धाडस होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मर्यादित आणि चुकीच्या पद्धतीने मांडण्याचे काम या लोकांनी केले. कोणती अमुक संघटना आमच्या विरोधात काम करत आहे हे सांगण्याऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संघटनांनी एकत्र यावे हे मात्र पद्धतशीरपणे विसरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे द्वेषाचे नाहीत तर यशाचे प्रतिक आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धच नाही तर लोकांची बुद्धीही वाढवली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक घरातील स्त्री घडवली, शिक्षण, हक्क अधिकार सर्वांना दिले या गोष्टी आम्ही सांगण्यात कमी पडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जातीचे नाहीत तर देशाचे उद्धारक आहेत याचेच भाण बोलणाऱ्यांना नसते. जयंतीला जर लाखों रुपयांचा चुराडा होत असेल आणि त्या ठिकाणी वाचनालय नसेल, समाजातील तरुण बेरोजगार असतील, दवाखान्यासाठी कोणाकडे पैसे नसतील, आणि तरीही डिजे लावलाच जात असेल तर हे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित आहे का? डिजे, मोठमोठे स्वतःचे बॅनर समाजाच्या पैशावर लावून नेमके काय सिद्ध करायचे असते हाच खुप गहण विषय आहे. डिजेच्या माध्यमातून वर्गणी गोळा करून जयंती साजरी करणे चुकीचेच आहे. जयंती खरच साजरी करायची असेल आणि जयंती साजरी केल्याचा फायदा सर्वांना होऊ द्यायचा असेल तर जयंतीच्या नावाखाली सध्या जेवढी वर्गणी जमा करता त्यापेक्षा जास्त जमा करावी. परंतु जमा झालेल्या पैशाचा उपयोग गावात शाळा, दवाखाना, रोजगाराची साधने उभी करण्यासाठी व्हावा. माणसाच्या शैक्षणिक, आरोग्य, रोजगार विषयक समस्या जर जयंती साजरी करण्याच्या माध्यमातून मिटत असतील तर दररोजच धुमधडाक्यात जयंती साजरी होईल. आपण हा विषय गांभीर्याने घेतला तर आपली स्वतःची शाळा, दवाखाने, रोजगार साधने, बँका प्रत्येक तालुक्यात उभे राहतील आणि तेव्हा आमचा स्वाभिमान खऱ्या अर्थाने जागृत असेल आणि भीमजयंती साजरी झाल्याचा आनंद हा गगनात न मावणारा असेल. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने नाचणे बंद केले पाहिजे आणि वाचणे सुरू केले पाहिजे. तरच येणाऱ्या पिढ्या आपण वाचवू. जयंती निमित्ताने चोवीस तास वाचन, अठरा तास वाचन हा केवळ देखावा आणि भक्तांचे लक्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दररोज एकच तास वाचा. परंतु नियमित वाचुन डोक्यात घ्या. तरच आपल्या भीमनीती कळेल आणि तेव्हाच भिमजयंती साजरी झाल्याचे समाधान मिळते. ■ ■


**विनोद सदावर्ते**
**मो. 9130979300**



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प ११९

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गोंडपिंपरी ता. चिमूर, जि. चंद्रपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे मुक्तीदाते असून आमचे आयुष्य त्यांनी फुलविले आहे. ही भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति आहे. परिसरातील लोक पुतळ्या जवळ दिनविशेष कार्यक्रमाला एकत्र येतात.

संवाद मित्र, मुकुंद मेश्राम.
9923522083

# जात उपवर्गिकरण :अंधारात तीर मारा, सरकारचा अफलातून निर्णय : आ. राजकुमार बडोले




**नागपूर :** दि.11-अनुसूचित जाती उप-वर्गिकरणाची सरकारला लगिन घाई झाली आहे. बदर अहवाल जाहीर न करता अंधारात नेम लावा.अशी स्पर्धा मुख्य सचिवांनी लावली आहे. त्याबाबतचा जीआर 10 एप्रिल रोजी काढला. तो अद्याप लोकांपर्यंत पोहचलाच नाही. त्यात 15 एप्रिल पर्यंत मुख्य सचिव समितीकडे तक्रारी नोंदवा. त्या तक्रार निवेदनांवर 17 व 18 एप्रिल रोजी समिती सुनावणी घेईल असे नमूद आहे. हा प्रकार थांबवा. अगोदर बदर अहवाल जाहीर करा.अन्यथा जनतेच्या असंतोषाला तोंड द्यावे लागेल. त्याची जबाबदारी सरकारवर राहील असा इशारा माजी समाजिक न्यायमंत्री आ. राजकुमार बडोले यांनी दिली.

ते म्हणाले अख्खा समाज 'भीम जयंती' महोत्सवात 15 दिवस गुंतला असतो. त्या महात्सवी काळात लोकांना सांगणे. तुम्ही अघोषित उपवर्गीकरणाचा अभ्यास करा. आणि समिती समोर परिक्षेला या, असा हा प्रकार आहे. मुख्यमंत्री, समाजिक न्यायमंत्र्यानी यात हस्तक्षेप करावा. लोकांना किमान 30 दिवस वेळ द्यावा. सरकारने स्वतः बुद्धीजीवी वर्गासोबत बसावे. विचारविमर्श करावा. तो पर्यंत लोकांना अहवाल उपलब्ध करून द्यावा. लोकांमध्ये असंतोष आहे. त्यांचा भडका उडण्या अगोदर उपाययोजना करावी असेही बडोले म्हणाले. या सोबतच लोकांनी आपले मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्या dg-sw@barti.in या मेलवर जास्तच जास्त नोंदवावे. सरकारने तक्रारी नोंदविण्यास उपरोक्त मेल उपलब्ध केला आहे.

# ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालयात सामाजिक समता सप्ताहांतर्गत पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन

**नागपूर :** ऑरेंज सिटी समाजकार्य महाविद्यालय, नागपूर येथे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' उत्साहात सुरू झाला असून, त्याअंतर्गत भारताचे संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

दि. 8 ते 14 एप्रिल 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहाचे उद्घाटन संस्थाध्यक्ष डॉ. केदारसिंह रोटेले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजेश मालविय, संचालक -नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वुमन, चिल्ड्रेन अँड युथ डेव्हलपमेंट, मनोज मोहिते (पत्रकार, महाराष्ट्र टाइम्स), प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम, प्रा. कल्पना मुकुंदे तसेच ग्रंथपाल व समान संधी कक्षाच्या समन्वयक डॉ. शालिनी तोरे प्रमुख उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी समाजकार्य महाविद्यालय, कामठी येथील प्राचार्य डॉ. रुबीना अन्सारी, डॉ. निशांत माटे, डॉ. शशिकांत डांगे तसेच ग्रंथालय विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

या पुस्तक प्रदर्शनीमध्ये संविधान, आंबेडकर विचार, जीवन व कार्यावर आधारित विविध मौल्यवान ग्रंथांचा समावेश करण्यात आला असून विद्यार्थ्यांसाठी ही प्रदर्शनी अत्यंत उपयुक्त असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. प्रदर्शनी 14 एप्रिल 2026 पर्यंत सर्वांसाठी खुली असून विद्यार्थ्यांसह नागरिकांनीही याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांनी केले.

सामाजिक समता सप्ताहानिमित्त महाविद्यालयात संविधान जागृती परीक्षा, निबंध स्पर्धा, वडार वस्तीमध्ये 'एक वही-एक पेन-एक लाडू' उपक्रम,' 'मी वाचलेले महामानवांचे पुस्तक' तसेच '14 एप्रिल - 14 तास अभ्यास - विकासाचा ध्यास' यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी शाळांमध्ये शिक्षकांना बोलावण्याविरोधात निवेदन



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी शासकीय सुट्टी असतानाही शाळांमध्ये शिक्षक व कर्मचाऱ्यांना कामासाठी बोलावले जात असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकारामुळे शिक्षकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप महासभेने केला आहे. यासंदर्भात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये जयंतीदिनी सुट्टीचे काटेकोर पालन करावे व शिक्षकांना विनाकारण शाळेत बोलावण्याची प्रथा तात्काळ थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रसंगी ज्योती खोब्रागडे, वंदना जीवने, प्रिया खोब्रागडे तसेच 'दी रिपब्लिकन' संघटनेचे कार्यकर्ते अरविंद थोरात, संतोष शिवनकर आणि मंदा वाघमारे उपस्थित होते. महासभेने प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर याबाबत तातडीने योग्य निर्णय घेतला गेला नाही, तर पुढील काळात आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल.

## राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरिंगमध्ये 'बॉलिवूड डे' साजरा

**चंद्रपूर :** सरदार पटेल मेमोरियल सोसायटीद्वारे संचालित राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, रिसर्च अँड टेक्नॉलॉजी येथील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागात 'बॉलिवूड डे' हा वार्षिक सांस्कृतिक सोहळा मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील CSE विभागासमोर आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी बॉलिवूड थीमवर आधारित वेगवेगळ्या अभिनव सादरीकरणांद्वारे आपल्या कला, अभिनय आणि नृत्यकौशल्याचे अप्रतिम दर्शन घडवले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिताडे तसेच विभागप्रमुख डॉ. नितीन जानवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांचे कौतुक करत मत व्यक्त केले. परीक्षक म्हणून भारत नाट्य नृत्य विशारद प्रशांत कत्तूरवार व डॉ. देवश्री कोडगिरे यांनी उपस्थित राहून सादरीकरणांचे बारकाईने परीक्षण केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन सारंगी धोटे व सारंग चन्ने यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. महेश डुंबेरे व प्रा. वृषाली आवळे यांनी केले. तसेच इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही मोलाचे सहकार्य करत कार्यक्रमाच्या यशस्वीतेत हातभार लावला.

## निधन वार्ता

### रमेश भाऊराव शिंदे



**नागपूर :** विठ्ठल नगर नागपूर येथील रहिवासी रमेश भाऊराव शिंदे यांचे शुक्रवारी रात्रीला निधन झाले. त्यांचे अंतिम संस्कार मानेवाडा घाट येथे शनिवार दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी 12 वाजता पार पडले त्यांच्या मागे पत्नी तीन मुली दोन मुले असा बराच आप्त परिवार आहे.

# प्रा. यशवंत मनोहर यांची 25 वर्षांच्या जनजागृती उपक्रमाची प्रेरणादायी परंपरा

**नागपूर :** ज्येष्ठ साहित्यिक प्रा. यशवंत मनोहर यांना त्यांच्या निवासस्थानी भेट देत पारिवारिक धम्म संगोष्ठी महिला मैत्री संघाच्या वतीने सन्मानपूर्वक अभिवादन करण्यात आले. हा उपक्रम केवळ औपचारिक नसून समाजासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा जिवंतपणी गौरव करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. लेखिका पुष्पा बौद्ध यांनी आपल्या सहचारिणी व सहकाऱ्यांसह ही भेट दिली. यावेळी प्रा. मनोहर यांना धम्माशी संबंधित ग्रंथ, नागचिन्ह, लहान संविधान पुस्तिका व पुष्पकुंडी देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी प्रा. मनोहर यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव कथन करत साहित्य, समाज आणि आंबेडकरी चळवळीबाबत मोलाचे विचार मांडले. त्यांच्या संवादातून उपस्थितांना प्रेरणा मिळाली. पारिवारिक धम्मसंगोष्ठी महिला मैत्री संघाच्या माध्यमातून गेल्या 25 वर्षांपासून नागपूरमध्ये हा जनजागृती उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या अंतर्गत विविध क्षेत्रातील ज्येष्ठ



महिला व पुरुषांना भेटून त्यांचा सन्मान करण्यात येतो तसेच त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली जाते.

'समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या हयातीतच सन्मान मिळायला हवा. मृत्यूनंतर शोक व्यक्त करण्यापेक्षा जिवंत असताना त्यांच्या कार्याची दखल घेणे अधिक महत्त्वाचे आहे,' असे मत पुष्पा बौद्ध यांनी व्यक्त केले. या भेटीदरम्यान सुषमा कळमकर, वंदना मानके, प्रभा रामटेके, लक्ष्मी बोरकर, अनीता वासनिक आदी सहकारी उपस्थित होते. अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्याची परंपरा पुढेही सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

# 14 एप्रिल रोजी लोकशाही बळकट करण्यासाठी मॅरेथॉन दौड निघणार



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅरेथॉन दौड समितीच्या वतीने येणाऱ्या 14 एप्रिल रोजी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने 14 एप्रिल रोजी, लेडी गव्हर्नर कमल गवई माजी आमदार डॉ. मिलिंद माने, झुंड सिनेमाचे शिल्पकार प्रा. विजय बारसे दिग्दर्शक नागराज मंजुळे प्रा. बबनराव तायवाडे प्रा. राजाभाऊ ताकसाळे, महापौर निता ठाकरे राज्य सभेच्या खासदर माया ईवनाते आणि अॅड. शैलेश नारनवरे, प्राचार्य रीना जनबंधू, आर.पी.टी.एस., कृष्णदत्त चौबे, डॉ. प्रज्ञय ताकसांडे, डॉ. शरद सूर्यवंशी, गुरुदेव नगराळे यांच्या उपस्थितीत 14 एप्रिल रोजी सकाळी 6 वाजता. संविधान चौकातून तर पवित्र दीक्षाभूमीवर चित्रकला महाविद्यालय समोर मॅरेथॉन दौडची सांगता होईल. लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅरेथॉन दौड या कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष यशवंत तेलंग आणि महासचिव योगेश ठाकरे यांनी केले आहे. आंबेडकरी जनतेला नम्र विनंती करण्यात येते की या मॅरेथॉन दौडमध्ये पांढरे शुभ्र वस्त्र धारण करून मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे व स्पर्धकांचे स्वागत करावे असे आवाहन केले जात आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वीरेंद्र दहीकर, संदीप सिंग अग्रवाल, ज्योती रोशन ढोके, अनुपमा तेलंग, प्रीती दहीकर, मिलिंद कापुरे, अशोक चौधरी, हे परिश्रम घेत आहेत.

# सोलापूरच्या भीम जयंती महोत्सवात जी.एम. संस्थेतर्फे साकारणार ए.आय. आंबेडकर देखावा



**सोलापूर :** सोलापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 14 एप्रिल या जयंती दिनापासून सुरू होणाऱ्या भीम जयंती महोत्सवात जी एम संस्थेतर्फे ए.आय. टेक्निक आधारित आंबेडकर देखावा सादर केला जाणार आहे. हा ए.आय. आधारित देखवा पाहण्यासाठी सोलापूरकरांमध्ये मोठी उत्सुकता लागून राहिली आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा जपण्यासाठी सन 2000 मध्ये जीएम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेची स्थापना संस्थापक बाळसाहेब वाघमारे आणि आधारस्तंभ दत्ता वाघमारे यांनी केली. गेल्या 26 वर्षांपासून ही संस्था सोलापूर शहरात शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात निरंतर सक्रिय आहे. दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून संस्था आपली सामाजिक बांधिलकी जपत आहे. यंदा जयंती मिरवणुकीत संस्थेमार्फत एआय आंबेडकर काळच्या पलीकडे दृष्टी हा नाविन्यपूर्ण देखावा सादर केला जाणार आहे. हा देखावा डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचा आणि आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा एक अनोखा संगम आहे. महामानवाचे विचार आजच्या डिजिटल युगातही किती दिशादर्शक आहेत, हे या तंत्रज्ञानाद्वारे प्रभावीपणे मांडले आहे. डॉ. बाबासाहेबांचे विचार विज्ञानावर आधारित होते. म्हणूनच यंदा आम्ही एआय तंत्रज्ञानाद्वारे त्यांची दूरदृष्टी मांडत आहोत. महामानवाचा राष्ट्रनिर्मितीचा आराखडा नव्या पिढीपर्यंत आधुनिक पद्धतीने पोहोचवणे, हाच आमचा मुख्य उद्देश असून यातून वैचारिक क्रांती घडवण्याचा आमचा मानस आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतेचे कार्य प्रेरणादायी : डॉ. सुचिता शिंदे

## बार्टी संस्थेत सामाजिक समता सप्ताहचे उद्घाटन

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सर्व घटकांना भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय मिळवून दिला. त्यांनी मिळवून दिलेल्या आधिकारामुळेच आज आपण प्रशासनात काम करत आहोत, त्यांचे समतेचे कार्य हे प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे शब्दात व पुस्तकात मोजता येत नसुन त्यांचे कार्य हे अखंड व आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत बार्टीच्या निबंधक डॉ. सुचिता शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले. बार्टी आयोजित सामाजिक समता सप्ताह 2026 या कार्यक्रमांचे उद्धघाटक म्हणून त्या बोलत होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त दि. 8 एप्रिल ते 14 एप्रिल 2026 पर्यंत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना. संजय शिरसाट, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक दिपा मुधोळ-मुंडे, निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात येत आहे. प्रबोधनात्मक कार्यक्रम, अभिवादन, संविधान जनजागृती अभियान, समता रॅली, 12 तास अभ्यास, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामुदायिकपणे वाचण करण्यात आले.

# महात्मा फुले ते डॉ. आंबेडकर : समता, तर्क आणि सामाजिक न्यायाचा विचार : डॉ. सुखदेव थोरात

**नागपूर :** महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, तर्क आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा उलगडा करत प्रख्यात अर्थतज्ञ व विचारवंत डॉ. सुखदेव थोरात यांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहाचा सखोल वेध घेतला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग व माजी विद्यार्थी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित 'फुल-शाहू-आंबेडकर विचारपरंपरा आणि सामाजिक परिवर्तन' या एक दिवसीय परिसंवादात ते उद्घाटक म्हणून बोलत होते. डॉ. थोरात यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांची तर्काधिष्ठित आणि अनुभवाधारित मांडणी केली. फुलेंचे शिक्षण स्कॉटिश मिशन शाळेत झाले असून युरोपियन



अभ्यासक्रमाचा त्यांच्या विचारांवर प्रभाव पडला. अनुभव, तर्क, विवेकबुद्धी आणि रॅशनलिझम या तत्त्वांवर फुलेंच्या विचारांचा पाया उभा असल्याचे त्यांनी नमूद केले. बौद्ध विचारांच्या प्रभावामुळे 'काहीही स्थायी नसते' ही भूमिका फुलेंनी स्वीकारल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. परिसंवादाच्या पहिल्या सत्रात अमरावती येथील स्त्रीवादी चळवळीच्या अभ्यासक डॉ. रोहिणी गायधने यांनी स्त्रीवादी शिक्षण, समता आणि सामाजिक पुनर्रचना या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ. प्रदीप मेश्राम यांनी पुरुषसत्ताक जातीव्यवस्था, शिक्षण आणि सत्तासंबंध यावर परखड भाष्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांचा संदर्भ देत त्यांनी तर्काधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी फुले-आंबेडकर विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता अधोरेखित केली. 1920 मधील माणगाव परिषद, 'बहिष्कृत भारत' आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा संदर्भ देत त्यांनी सामाजिक न्यायाच्या चळवळीचा इतिहास उलगडला. या परिसंवादाला संशोधक, माजी विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी माजी विद्यार्थी संघटनेचे आभार मानून परिसंवादाचा समारोप करण्यात आला.







# इंदोरा - दिघोरी पुलाला सम्राट अशोकाचे नाव देण्याची मागणी

## केंद्रीय मंत्री गडकरींना निवेदन

**नागपूर :** सम्राट अशोका फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश गोटेकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि इंदोरा-दिघोरी पुलाला प्रियदर्शी सम्राट अशोकाचे नाव देण्याची मागणी केली. इतर मागण्यांमध्ये अशोक चौकात सम्राट अशोकाचा पूर्णाकृती पुतळा बसविणे (स्टॅच्यू ऑफ पीस), संविधानाने स्वीकारलेले राष्ट्रीय अशोक चिन्ह स्थापित करणे, केंद्र सरकारने सम्राट अशोकाच्या जयंतीनिमित्त तिथिनुसार सुट्टी जाहीर करणे, अशोक कालीन स्तूप, लेणी, शिलालेख आणि स्तंभांचे जतन करणे, तसेच पुलाच्या स्तंभांवर सम्राट अशोकाचे जीवन दर्शवणारी भित्तिचित्रे रेखाटणे यांचा समावेश करण्यात यावा. छत्रपती चौकातील शिवाजी महाराज आणि त्यांच्या सैन्याच्या पुतळ्याप्रमाणेच सम्राट अशोकाच्या पुतळ्याचीही सजावट करण्यात यावी. विजयादशमीपर्यंत हे काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. शिष्टमंडळात कृष्णा सहारे, राजू गणवीर, अनिलनाथ शील, किरण गौरखेडे, शिल्पा नागदेवते, नंदिनी वाळके, लीला तामगाडगे, पुष्पा धाबर्डे, रमा रामटेके, रत्नमाला नगरारे, प्रतिभा गोटेकर, माधुरी तायडे, भीमराव निकोसे, एस. म्हैसकर, शंभूराजे आदींचा समावेश होता. केंद्रीय मंत्र्यांनी शिष्टमंडळाला आश्वासन दिले आहे. अशी माहिती सुरेश गोटेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.






बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648